केडगाव, अहिल्यानगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR




Volume - 74 | Issue- 200 | Marathi Daily | Friday 17/4/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख : नेमके सत्य काय? पान २


स्वर्गीय जगताप यांच्या स्मरणार्थ दि. १९ पासून संगीतमय रामकथा पान ५


त्रिवेणी संगमद्वारा अक्षय पुण्यप्राप्तीचा योग पान ६

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे




माझ्याकडे परदेशातून नातेवाईक आले आहेत. ते विचारीत होती की महिलांवरील अत्याचार किंवा भोंदूबाबाची बातमी नसलेले एकही दैनिक किंवा साप्ताहिक निघत नाही का तुमच्याकडे?

### राज्यात आतापर्यंत उष्माघाताचे १७ रूग्ण

# जिल्ह्यात उष्मालाटेचा 'यलो अ‍ॅलर्ट'

**समाचार/नगर-दि.१७**

भारतीय हवामान खात्याद्वारे १७ एप्रिल २०२६ रोजी नगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.



राज्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने आता उष्माघाताचे रुग्ण आढळत आहेत. राज्यात एक मार्च ते १५ एप्रिलदरम्यान उष्माघाताच्या १७ रुग्णांची नोंद झाली. रत्नागिरी आणि पुणे जिल्ह्यांत सर्वाधिक रुग्ण आढळले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात सर्वाधिक चार रुग्णांची नोंद झाली आहे. पुणे जिल्ह्यात तीन रुग्ण आढळले असून, जालना आणि पालघर येथे प्रत्येकी दोन रुग्ण नोंदवण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात आढळलेल्या तीन (पान ३ वर)

### जिल्हा प्रशासनाचे आवाहन

उष्माताघातापासून बचाव करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे. नागरिकांनी स्वत:बरोबरच पुश-प्राण्यांची काळजी घ्यावी. तसेच मदतीसाठी आपत्कालीन विभागाशी संपर्क साधावा. दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर जाणे टाळावे, उन्हात कष्टाचे काम करु नये, गडद घट्ट जाड कपडे घालण्याचे टाळावे, दारु, चहा, कॉफी, कार्बोनेटेड थंड पेय घेऊ नये, उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नये, उन्हाच्या कालावधित शक्यतो स्वयंपाक करण्याचे टाळावे. मदतीसाठी व आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांनी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# देशात महिला आरक्षण कायदा लागू

**समाचार/नवी दिल्ली-दि.१७**

महिला आरक्षण कायदा (नारी शक्ती वंदन अधिनियम २०२३) केंद्रीय कायदे मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार १६ एप्रिल २०२६ पासून देशभरात लागू झाला आहे. त्याची अधिसूचना काल मध्यरात्री काढण्यात आली. यानुसार लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के (एक-तृतीयांश) जागा राखीव असतील. हा कायदा १०६ व्या संविधान दुरुस्ती अंतर्गत लागू करण्यात आला आहे.

हा कायदा लागू झाला असला तरी, तो थेट सध्याच्या लोकसभेत लागू होणार नाही. पुढील जनगणना आणि त्यानंतरच्या सीमांकन प्रक्रियेनंतरच आरक्षित जागा निश्चित केल्या जातील. त्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये या कायद्याचा प्रत्यक्ष लाभ मिळण्याची शक्यता आहे.हा कायदा संसदेत मंजूर झाल्यानंतर आणि सप्टेंबर २०२३ मध्ये तत्कालीन प्रक्रियेतून गेल्यानंतर, आता १६ एप्रिल २०२६ पासून अधिकृतपणे प्रभावी झाला आहे.

## निवडक

### वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली



**बीड, दि. १७–** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेला मुख्य आरोपी वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली असून उपचारासाठी त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, यापूर्वी अनेकवेळा वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळल्याने त्याचा तुरुंगातील मुक्काम वाढला आहे. आरोपी वाल्मीक कराडला अस्वस्थ वाटू लागल्याने आज सकाळी मोठ्या पोलीस बंदोबस्तात रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांकडून आरोपी वाल्मीक कराडच्या चाचण्यासंदर्भात प्रक्रिया करण्यात आली. यावेळी, रुग्णालयाबाहेर मोठा बंदोबस्त तैनात होता. तर, वाल्मिक कराडचे कार्यकर्तेही रुग्णालयाबाहेर गर्दी करुन उभे होते. दिवंगत सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाला जवळपास दीड वर्षाहून अधिक काळ पूर्ण होत आला असून सध्या न्यायालयात खटला सुरू आहे. याप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिकसह ५ जण अटकेत असून कृष्णा आंधळे हा आरोपी अद्यापही फरार आहे. वाल्मिकने सातत्याने जामीनासाठी अर्ज केला होता. आधी सत्र न्यायालय पुन्हा उच्च न्यायालय आणि आता सर्वोच्च न्यायालयाने वाल्मिकचा जामीन फेटाळला.

### विधानपरिषदेच्या एका जागेसाठी आघाडीत मोठी रस्सीखेच

# काँग्रेसकडून आजी-माजी प्रदेशाध्यक्षांची नावे चर्चेत; ठाकरेसेनेत इच्छुकांची भाऊगर्दी

**समाचार/मुंबई-दि.१७**

विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होत असून त्यामध्ये विरोधी महाविकास आघाडीच्या वाट्याला येणाऱ्या एका जागेसाठी काँग्रेस आणि ठाकरेसेनेत मोठी रस्सीखेच होण्याची शक्यता दिसू लागली आहे. या निवडणुकीसाठी आघाडीत शरद पवार राष्ट्रवादीने ठाकरेसेनेला यापूर्वीच पाठिंबा दिला आहे. त्यामुळे या निवडणुकीत ठाकरेसेना कोणाला उमेदवारी देणार, याची उत्सुकता असतानाच आघाडीचा घटक पक्ष काँग्रेसनेही या एका जागेवर दावा सांगितला असल्याची माहिती आहे.



काँग्रेसकडून विधानपरिषदेसाठी पक्षाचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांचेही नाव चर्चेत आहे. दरम्यान ठाकरेसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विधानपरिषदेची निवडणूक लढविल्यास काँग्रेसकडून त्यांना पाठिंबा दिला जाईल, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात आहेत.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ९ सदस्यांचा कार्यकाळ संपुष्टात येत असल्याने विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ९ जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होत आहे. राज्यातील सत्ताधारी महायुतीकडे मोठे बहुमत असल्याने संख्याबळानुसार या निवडणुकीत महायुतीचे ९ पैकी ८ सदस्य निवडून येतील तर विरोधी महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघी एक जागा येणार आहे. या एका जागेसाठी आघाडीत मोठी रस्सीखेच होण्याची चिन्हे आहेत. या निवडणुकीसाठी आघाडीत शरद पवार राष्ट्रवादीने (पान ३ वर)

### कारची कंटनेरला धडक; समृध्दी महामार्गावर अपघात

# खरातच्या शिवनिका ट्रस्टच्या उपाध्यक्षाचा अपघाती मृत्यू

**समाचार/शिर्डी-दि.१७**

छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात असताना धोत्रे गावाजवळ उभ्या असलेल्या कंटेनरला कारने पाठीमागून धडक दिली. या भीषण अपघातात भोंदूबाबा अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष आणि खरात याचे अत्यंत निकटवर्तीय जितेंद्र शेळके यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

शेळके आपल्या कुटुंबासह कारने प्रवास करत होते.धोत्रे गावाजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका कंटेनरचा अंदाज न आल्याने त्यांची कार थेट कंटेनरच्या मागील भागात घुसली. ही धडक इतकी भीषण होती की, कारचा चक्काचूर झाला असून जितेंद्र शेळके यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या अपघातात जितेंद्र



शेळके यांचा मुलगा आणि पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. जितेंद्र शेळके हे अशोक खरातचे अत्यंत विश्वासू मानले जात होते.

खरात याच्या शिवनिका ट्रस्टचे ते उपाध्यक्ष म्हणून काम पाहत होते. गेल्या काही दिवसांपासून खरातला अटक झाल्यापासून जितेंद्र शेळके मोठ्या मानसिक तणावाखाली होते, अशी माहिती समोर येत आहे.

### २० एप्रिलला कार्यकर्त्यांच्या बैठकीत भूमिका स्पष्ट करणार

# माजी मंत्री प्राजक्त तनपुरे देणार भाजपाला पाठिंबा?

**समाचार/नगर-दि.१७**

राहुरी तालुक्याच्या विकासाच्या प्रश्नांवर आपण राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतून माघार घेतली. तालुक्याचे विकासाचे प्रमुख प्रश्न मार्गी लागावेत, या आपल्या भूमिकेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. आता या निवडणुकीत काय भूमिका घ्यायची, याबाबतचा निर्णय येत्या २० एप्रिलला कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेतला जाईल, असे शरद पवार राष्ट्रवादीचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी स्पष्ट केले



आहे. दरम्यान भाजपा महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची २० एप्रिलला राहुरीत जाहीर सभा होणार असून याचदिवशी तनपुरे या निवडणुकीबाबत आपली भूमिका स्पष्ट करणार असल्याने तालुक्याच्या विकासाच्या मुद्द्यावरच तनपुरे भाजपाला सक्रिय पाठिंबा देण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

भाजपाचे दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने रिक्त झालेल्या राहुरी विधानसभा मतदारसंघात येत्या २३ एप्रिलला पोटनिवडणूक होत आहे. शरद पवार राष्ट्रवादीचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी या निवडणुकीतून माघार घेतली. तत्पूर्वी त्यांची भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट घेऊन बंद दाराआड चर्चा केली. त्यानंतर राहुरी तालुक्याच्या विकासाच्या प्रश्नांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगत तनपुरे यांनी निवडणुकीतून माघार घेतली. मात्र या निवडणुकीत तनपुरे भाजपला पाठिंबा देणार का? (पान ३ वर)




### संगमनेरला पावणेचार लाखाचा मुद्देमाल हस्तगत

# अ‍ॅपे रिक्षातून विदेशी दारुची वाहतूक पकडली



**समाचार/नगर-दि.१७**

संगमनेर येथे विदेशी दारुची वाहतूक करणाऱ्या इसमाकडून ३ लाख ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, संतोष खैरे, विजय पवार, (पान ३ वर)

### बाल संगोपन योजनेत राज्यात सर्वाधिक लाभार्थी

# महिला व बालविकास योजनेत नगर जिल्हा आघाडीवर

**समाचार/नगर-दि.१७**

महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे नगर जिल्हा राज्यात आघाडीवर असून, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेत सर्वाधिक लाभार्थी जिल्ह्यात आहेत. सन २०२४-२५ मध्ये ७ हजार १२३ लाभार्थ्यांना १९ कोटी २३ लाख २१ हजार रुपयांचे वितरण करण्यात आले, तर सन २०२५-२६ मध्ये १० हजार १११ लाभार्थ्यांना आतापर्यंत ४ कोटी ५४ लाख ९९ हजार ५०० रुपये वितरित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय कदम यांनी दिली. बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. २७ नोव्हेंबर ते ८ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या अभियानादरम्यान प्रभावी जनजागृती व कृतीमुळे हे यश संपादन झाले. मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत कार्यरत चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) द्वारे २४ तास सेवा उपलब्ध करून दिली जात असून, मागील वर्षभरात ४८ बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

महिला व बाल विकास विभागाच्या १३ कार्यालयांसाठी अहिल्या भवन उभारणीस १५ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता (पान ३ वर)

### १५ मुलांना शासकीय नोकरी

केंद्र शासनाच्या प्रतिपालकत्व व प्रायोजकत्व योजनेंतर्गत कोरोना काळात पालक गमावलेल्या मुलांना आधार देण्यात आला असून, एकूण १ हजार ५२१ मुलांना ५ कोटी ४७ लाख ५६ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. जिल्ह्यात अनाथ प्रमाणपत्राच्या माध्यमातून ५४६ मुलांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले असून, त्यापैकी १५ मुलांना शासकीय नोकरी मिळाली आहे.

संपादकीय

# नेमके सत्य काय ?

'रुपया घसरत नाहीये, तर डॉलर मजबूत होत आहे' हा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा सतत चर्चेत असणारा आणि काही वेळा विनोदाचा विषय बनणारा युक्तिवाद पूर्णपणे चुकीचा नाही; पण तो अपूर्ण आहे. कारण तो देशांतर्गत आर्थिक आव्हानांकडे दुर्लक्ष करतो. गुंतवणूक वाढवणे, निर्यात वाढवणे, आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि आर्थिक धोरणांमध्ये स्थैर्य राखणे या सर्व बाबींचा एकत्रित विचार केल्याशिवाय रुपयावरील दबाव कमी होऊ शकत नाही. परकीय चलन साठा हा कोणत्याही देशाच्या आर्थिक सुरक्षिततेचा महत्त्वाचा आधार असतो. सतत डॉलर विकून रुपयाला आधार देण्याचा प्रयत्न केल्यास या साठ्यावर ताण येऊ शकतो. साठा कमी झाला, तर आंतरराष्ट्रीय बाजारात देशाच्या विश्वासार्हतेवर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे रिझर्व्ह बँकेचे हे पाऊल आवश्यक असले, तरी ते दीर्घकालीन उपाय ठरू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. रुपयाच्या घसरणीचा व्यापक अर्थकारणावर होणारा परिणामही विचारात घ्यावा लागतो. रुपया कमकुवत झाल्यास आयात महाग होते, विशेषतः कच्चे तेल. भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेत महागाईवर याचा थेट परिणाम होतो. पेट्रोल-डिझेलच्या किंमती वाढतात, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम सर्वसामान्य वस्तूंच्या किमतींवर होतो. अशा परिस्थितीत महागाई नियंत्रणात ठेवणे ही मोठी कसरत ठरते. दुसऱ्या बाजूला, रुपया घसरल्यास निर्यातदारांना काही प्रमाणात फायदा होऊ शकतो कारण त्यांना त्यांच्या मालासाठी अधिक रुपये मिळतात; परंतु हा फायदा तितकाच मर्यादित असतो. कारण जागतिक मागणीतील चढ-उतार आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे त्याचा परिणाम संतुलित होतो. त्यामुळे रुपयाची घसरण सर्वांसाठी फायदेशीर ठरते, असा सोपा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरते. भारतीय रुपयाची घसरण हा केवळ चलन बाजारातील तांत्रिक बदल नसून देशाच्या एकूण आर्थिक आरोग्याचा महत्त्वाचा निर्देशक मानला जातो. जागतिक स्तरावर वाढती अनिश्चितता, भांडवली प्रवाहातील चढ-उतार आणि देशांतर्गत आर्थिक आव्हाने यांच्या संगमातून रुपयावर दबाव निर्माण होतो आणि त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेत उमटतात. म्हणूनच रुपयाच्या घसरणीकडे केवळ आकड्यांच्या दृष्टीने न पाहता व्यापक परिणामांच्या संदर्भात पाहणे आवश्यक ठरते. रुपया कमकुवत होण्याचा सर्वात तात्काळ आणि प्रकर्षाने जाणवणारा परिणाम म्हणजे आयात महाग होणे. भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर आयातीवर, विशेषतः कच्च्या तेलावर अवलंबून आहे. रुपया डॉलरच्या तुलनेत घसरतो, तेव्हा तेल आयात करण्यासाठी अधिक रुपये मोजावे लागतात. याचा थेट परिणाम पेट्रोल-डिझेलच्या किंमतींवर होतो आणि त्यानंतर वाहतूक खर्च वाढून महागाईला चालना मिळते. ही महागाई केवळ इंधनापुरती मर्यादित राहत नाही, तर अन्नधान्यापासून दैनंदिन वापराच्या वस्तूंपर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये पसरते. महागाई वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या क्रयशक्तीवर परिणाम होतो. पगार तेवढाच राहतो; पण खर्च वाढतो. निर्यातक्षेत्रासाठी रुपयाची घसरण काही प्रमाणात लाभदायक ठरते, असा पारंपरिक युक्तिवाद केला जातो. रुपया स्वस्त झाल्यामुळे भारतीय वस्तू आंतरराष्ट्रीय बाजारात तुलनेने स्वस्त होतात आणि निर्यात वाढू शकते; परंतु हा फायदा प्रत्यक्षात अनेक मर्यादांमध्ये अडकलेला असतो. कारण निर्यात वाढण्यासाठी केवळ चलनाचा दरच पुरेसा नसतो, तर उत्पादनक्षमता, गुणवत्ता, जागतिक मागणी आणि व्यापार धोरणेही तितकीच महत्त्वाची असतात. त्यामुळे रुपयाच्या घसरणीचा निर्यातीवर होणारा सकारात्मक परिणाम मर्यादित आणि असमान असतो. रुपयाच्या घसरणीचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे परकीय कर्जाचा बोजा वाढणे. ज्या कंपन्यांनी किंवा सरकारने परकीय चलनात कर्ज घेतले आहे, त्यांना ते परत करताना अधिक रुपये मोजावे लागतात. यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीवर ताण येतो. काही वेळा याचा परिणाम गुंतवणुकीच्या निर्णयांवर होतो आणि आर्थिक वाढीचा वेग कमी होऊ शकतो. या साऱ्या प्रक्रियेत रिझर्व्ह बँकेची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. रुपयावरील दबाव कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक व्याजदरांमध्ये बदल करते किंवा परकीय चलन बाजारात हस्तक्षेप करते; मात्र या उपाययोजना नेहमीच संतुलित पद्धतीने कराव्या लागतात. व्याजदर वाढवले, तर महागाई आटोक्यात येऊ शकते; पण त्याचा परिणाम कर्जमहागाईवर होऊन उद्योगांवर ताण येतो. रुपयाच्या घसरणीचा परिणाम गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवरही होतो. परकीय गुंतवणूकदारांना चलनातील अस्थिरता नको असते. रुपया सातत्याने कमकुवत होत आहे, असे वाटल्यास ते गुंतवणूक काढून घेण्याचा निर्णय घेऊ शकतात. यामुळे भांडवली बाजारात अस्थिरता वाढते आणि अर्थव्यवस्थेवर आणखी दबाव निर्माण होतो. याच वेळी, सरकारसमोरही अनेक आव्हाने उभी राहतात. एकीकडे महागाई नियंत्रणात ठेवण्याचा दबाव असतो, तर दुसरीकडे आर्थिक वाढ कायम ठेवण्याची गरज असते. आयात कमी करणे, निर्यात वाढवणे, परकीय गुंतवणूक आकर्षित करणे आणि आर्थिक सुधारणा राबवणे या सर्व उपाययोजनांचा समन्वय साधावा लागतो; परंतु या उपाययोजना दीर्घकालीन असतात आणि त्यांचे परिणाम तात्काळ दिसून येत नाहीत. रुपयाच्या घसरणीकडे पाहताना एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी लागते, ती म्हणजे हा प्रश्न केवळ देशांतर्गत धोरणांपुरता मर्यादित नसतो. जागतिक अर्थव्यवस्थेतील बदल, भू-राजकीय तणाव, तेलाच्या किमती आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील घडामोडी या सर्वांचा त्यावर प्रभाव असतो. त्यामुळे रुपयाची घसरण ही अनेक घटकांच्या परस्परसंवादातून निर्माण झालेली परिस्थिती असते. रुपयाची घसरण ही केवळ एक आर्थिक घटना नसून एक व्यापक संकेत आहे. तो अर्थव्यवस्थेतील ताकद आणि कमकुवतपणाचा, धोरणांच्या परिणामकारकतेचा आणि जागतिक बदलांना प्रतिसाद देण्याच्या क्षमतेचा संकेत आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे केवळ अल्पकालीन उपायांच्या दृष्टीने न पाहता दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे.

## वाडियापार्क लेडिज क्लब येथे चैत्रगौरीचा हळदी-कुंकू कार्यक्रम



**समाचार/नगर-दि.१७**

वाडिया पार्क लेडीज क्लब येथे दि. १० एप्रिल रोजी गायत्री मंदिर येथे चैत्रगौरीच्या हळदी कुंकवाचे कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सदर कार्यक्रमाच्या निमित्ताने सुकन्या फणसळकर मानसोपचार तज्ञ यांचे 'स्वस्थ रहा मस्त रहा' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. यानिमित्ताने महिलांनी स्वतः कडे लक्ष द्यावे स्वतःचे छंद जोपासावे, आनंदी राहावे, स्वतःचा विचार करावा, ध्यान धरणा व्यायाम या गोष्टींकडे लक्ष द्यावे असं सांगितले. सुरुवातीला लिखाणाची स्पर्धा आयोजिली होती व मेंदूला चालना मिळावी म्हणून ही स्पर्धा आयोजित केलेली होती या स्पर्धेत महिलांनी उत्स्फूर्त भाग घेतला .

स्पर्धेचे आयोजन सुनीता देव यांनी केले होते या कार्यक्रमांमध्ये चैत्र गौरीची सजावट वाखाण्यासारखी होती. ही सजावट सुनिता देव व मीना पाठक यांनी केली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. नीलिमा औटी होत्या. पाहुण्यांचा परिचय स्नेहा रानडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुनिता देवयानी केले.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरता क्लबच्या कार्यकर्त्यांनी मदत केली. जयश्री डावरे, संध्या गड्डम, सुनिता देव, मीना पाठक, नीलिमा औटी यांनी परिश्रम घेतले. अध्यक्ष ॲड. नीलिमा औटी यांनी आभार मानले.



माउली संकुल येथे आयोजित युवा पथ प्रदर्शक कार्यक्रमाच्या निमित्ताने वृंदावन येथील प्रसिद्ध भागवत कथाकार आणि आध्यात्मिक उपदेशक श्री इंद्रेश उपाध्याय महाराज आले असताना जगभरातील १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या सहसंचालीका व सुप्रसिद्ध प्रेरक वक्ता ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी व १८४ विश्वविक्रम करणारे ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ दीपक हरके यांनी त्यांची भेट घेऊन ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली व श्रीकृष्णाची फ्रेम देऊन त्यांना सन्मानित केले.

# कर्टन कॉल

चित्राभिनय आणि नाटकात पडदा नसणे याविषयी आपण सुतोवाच केलं होतं. आता पुढे...चित्राभिनय म्हणजे, हात डोक्यावर उंच उभारून आणि दोन्ही हात पसरून उंच डोंगर आणि झाडे सूचित करावीत आणि पताका मुद्रा दाखवून मोठ्या जलाशयाची किंवा समुद्राची कल्पना द्यावी. ( २५. ७६-७७) स्टेजच्या मागील बाजूस बसलेल्या पात्रांचा भरतमुनींनी जो उल्लेख केलाय त्यावरून दगड, पेट्या यासारखी उच्चासनं तिथे असत आणि ती बहुतेक विविधोद्देशी असत. घराचे छप्पर किंवा राजाचे सिंहासन यासाठी त्याचा उपयोग केला जाई.




त्याकाळी नाटकात पडदे नव्हते. पडदा पडला किंवा बदलला म्हणजे एक प्रवेश संपून दुसरा सुरु झाला अशी प्रथा नव्हती. त्यावेळी अंक असत पण अंक संपला हे दाखवण्यासाठी रंगभूमीवरील सगळी पात्र निघून जात. त्यावरून प्रेक्षकांनाही अंक संपल्याची जाणीव होत असे. अंक संपल्यावर मध्यन्तर वगैरे काहीही नसे. पुढचा अंक लगेच चालू होई. ( कुठल्याही कलाकृतीचा आस्वाद घ्यायचा झाल्यास तो एकसंध घेता आला पाहिजे असा मानस असावा बहुतेक किंवा राजाश्रय असल्याने मध्यन्तरात नाट्यगृहात खाण्याचे प्रकार विकून जोडधंदा करण्याची गरज नसावी) नाटकाच्या सुरवातीपासून शेवटापर्यंत प्रयोगात खंड नसे. नाटकात सगळ्या घटना एकाच जागी घडल्या पाहीजेत असा निर्बंध नसल्याने अंकातील घटनेचे स्थळ बदलले जाई. (थोडक्यात आजच्या बॉक्स सेटपेक्षा सादरीकरणात अधिक स्वातंत्र्य आणि वैविध्य असे.) स्थळबदल दाखवण्याची युक्तीही फार सोपी होती. घराबाहेरच्या एका स्थानापासून दुसऱ्या जागी जायचं असेल तर पात्रानी एक प्रदक्षिणा घालायची की झालं. प्रेक्षकही प्रसंगाचं स्थान बदलल्याच समजत. पण घराबाहेरील प्रसंग संपून घरात पुढचा प्रसंग घडणार असेल तर तो स्टेजच्या मागच्या बाजूला दाखवण्यात येई. यावेळी मात्र पडद्याचा उपयोग केला जाई. या पडद्याला अपटी, जवनिका किंवा तिरस्करणी म्हंटल जाई. पडदा तात्पुरता असून तो रंगभूमी झाकण्याइतका रुंदीचा किंवा उंचीचाही नसे. पडदा कापडाचा तुकडा असून तो दोन माणसं दोन टोकाला ताणून अंतरपाटासारखा धरून उभे रहात. या पडद्यामागे पात्र कथानकाप्रमाणे प्रवेश करत, उभी रहात, बसत किंवा हालचाल करत. देखावा किंवा स्थानवैशिष्ट्य(सीन, सॅटिंग) बदलण्यासाठी आणखी कोणत्याही गोष्टींची आवश्यकता नसे. पात्राने रंगभूमीवर प्रवेश केल्यावर त्याचं पहिलं काम म्हणजे नव्या देखाव्याचं, नव्या स्थानाचं वर्णन करायचं. उदाहरणार्थ शोभिवंत उद्यान, राजवाडा किंवा नाटकात असलेलं कोणतंही स्थान. पात्राने वर्णन केलेल्या दृश्यावर प्रेक्षक विश्वास ठेवत. नाटककाराला आपल्या वर्णनशैलीची आणि त्याला लागणाऱ्या कलात्मकता आणि कल्पकतेची झलक याठिकाणी चांगल्याप्रकारे दाखवता येण्याची संधी असे. नाटकाच्या शेवटी सर्व पात्र आपापल्या भूमिका विसरून नटवर्ग म्हणून एकत्र येऊन भरतवाक्य' म्हणत. हे भरतवाक्य कुठल्याही पात्राच नसून नाट्यशास्त्र'कार भरतमुनींनी केलेली प्रार्थना होय. त्यावेळच्या नाटकात एकाच अंकात निरनिराळ्या स्थळांचे, देखाव्यांचे दर्शन कसं घडवीत यासंबंधीचे एक उदाहरण दाखवलं तर हा विषय अधिक स्पष्ट होईल. यासाठी कालिदासाच्या, अभिज्ञानशाकुंतल' नाटकाचा पाचवा अंक घेऊ. या अंकात शकुंतला पाठराखीण घेऊन दुष्यन्ताच्या राजवाड्यात येते. पण तो तिला घालवून देतो. का आणि कसं पाहुच पुढील लेखात.

**- देवाशिष शेडगे**

मो.८८०६०४४४८६




### राशीभविष्य

- **मेष** : विवाहाची बोलणी सफल होतील. व्यवसायात उलाढाल वाढेल. नव्या ओळखी लाभदायक ठरतील.
- **वृषभ** : आत्मविश्वासाने निर्णय घ्या. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. सामाजिक कार्यात सहभाग घडेल.
- **मिथुन** : सरकारी कामं रखडतील. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावं. व्यवसायात नुकसान संभवतं.
- **कर्क** : ग्रहमानाची अनुकूलता राहील. प्रलंबित कामांना गती येईल. नोकरीत बदली-बढतीचे योग आहेत.
- **सिंह** : कौटुंबिक वादविवाद संभवतात. शिक्षणक्षेत्रात अनुकूलता राहील. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **कन्या** : कमी बोलणं हिताचं ठरेल. महत्त्वाची कामं मनाजोगी होतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल.
- **तूळ** : व्यवसायात कामाचा ताण वाढेल. खरेदीचे व्यवहार मार्गी लागतील. उपजत गुणांना वाव मिळेल.
- **वृश्चिक** : प्रियजनांसाठी खर्च करावा लागेल. छोटा-मोठा प्रवास घडेल. आलेल्या संधींचा लाभ घ्यावा.
- **धनु** : आर्थिक उत्कर्षाच्या संधी लाभतील. करारास अनुकूलता राहील. यांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. विद्यार्थ्यांच्या प्रगतीला वाव मिळेल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **कुंभ** : महत्त्वाची वार्ता येईल. प्रेमप्रकरणात दिलासा मिळेल. घरात मंगलकार्याची बोलणी होतील.
- **मीन** : इतरांच्या वादात मध्यस्थी नको. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृती उत्तम राहील.

### दिनविशेष — १८ एप्रिल

- **१९५५** : अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाइन यांचं निधन.
- **१९८३** : बैरुतमध्ये अमेरिकेच्या वकीलातीवर हल्ला.
- **२०१७** : बाबरी मशीद पाडल्याप्रकरणी लालकृष्ण अडवानी, मुरलीमनोहर जोशी आणि उमा भारती यांच्यासह काहींवर खटला चालवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश.
- **२०१८** : मुंबई बॉंबस्फोट प्रकरणातील फाशीची शिक्षा झालेल्या ताहिर मर्चंटचा मृत्यू.

### योगाभ्यास — उपयुक्त मुद्रा

आपण योगासनांचे महत्त्व जाणतो. हस्त मुद्रा हा योगाचाच एक भाग आहे. नृत्य हा योग आणि एक प्रकारचे आसन मानले जाते कारण त्यात अनेक प्रकारच्या मुद्रा बनवल्या जातात. त्यात हाताच्या मुद्रादेखील दिसतात. हाताचे हावभाव प्रभावी असल्यामुळे त्याचा परिणाम शरीराच्या नसा आणि नाडींवर होतो. निर्धारित वेळी सराव केल्यास प्रत्येक मुद्रा अत्यंत प्रभावी ठरते.



अशीच एक लाभकारक मुद्रा करण्यासाठी हृदय चक्राजवळ तळवे एकमेकांच्या समोर आणा. उजव्या हाताचा अंगठा (अग्नि तत्व), तर्जनी (वायु तत्व), मध्य बोट (आकाश तत्व), अनामिका (पृथ्वी तत्व) आणि करंगळी (जल तत्व) यांची पेरे डाव्या हाताच्या बोटांच्या संपर्कात आणा. यावेळी बोटे पसरलेली राहतील म्हणजेच चार बोटे पुढे आणि अंगठा वर असेल. तळवे एकमेकांच्या संपर्कात नसावेत. यावेळी पुढचे हात जमिनीला समांतर असावेत आणि कोपर बाहेरच्या दिशेला असावेत. आता पाठीचा कणा सरळ ठेवून डोळे बंद करून सराव करा.

या सरावासाठी पहाटेची वेळ सर्वात उत्तम मानली जाते. या मुद्रेचा सराव केल्याने शरीरातील पाच घटकांचा समतोल साधला जातो. हे अजना चक्र उत्तेजित करत असल्यामुळे बुद्धिमत्ता आणि मनाची शक्ती वाढते. कोणत्याही शारीरिक व्याधीतून बरे होण्यासाठी ही एक योग्य मुद्रा आहे. हे एकाग्रता शक्ती सुधारण्यास मदत करते आणि तर्कशक्ती देखील सुधारते. प्रदीर्घ सरावाने मनाला शांती मिळते.

### टेक फन — शॉर्ट अँड स्वीट व्हिडिओसाठी...

फोनमधल्या दर्जेदार कॅमेऱ्यामुळे चांगले फोटो काढता येतात आणि व्हिडिओ शूटही करता येतं. असे व्हिडिओ एडिट करण्यासाठी स्मार्टफोन्समध्ये वेगवेगळी टूल्सही असतात. त्यांचा वापर करुन तुम्ही व्हिडिओ शॉर्ट अँड स्वीट करु शकता. अगदी सहजतेने व्हिडिओ एडिट करु शकता. यामुळे नको असलेले शॉट्स डिलिट होतील आणि व्हिडिओ बघताना कंटाळा येणार नाही. व्हिडिओ ट्रिम कसा करायचा, याबाबतच्या खास टिप्स...

* सर्वप्रथम व्हिडिओ ओपन करा. आता वर कात्रीचा आयकॉन दिसेल. काही स्मार्टफोन्समध्ये पेन्सिलचा आयकॉन असतो. या आयकॉनवर क्लिक करा.
* आता स्क्रीनवर एक टाईमलाईन दिसेल. ही व्हिडिओ टाईमलाईन आहे. या टाईमलाईनवर व्हिडिओची प्रत्येक फ्रेम दिसेल.
* हा व्हिडिओ एका बाजूने ड्रॅग करा. कापायच्या भागावर टॅप करा. व्हिडिओची लेंथ सिलेक्ट करा.
* ट्रिम झाल्यानंतर व्हिडिओ सेव्ह करा.

### ब्युटी टॉक — उन्हाळ्यासाठी मेक अप टिप्स

* ब्राँझर हे मेक अप उत्पादन सध्या बरंच लोकप्रिय ठरत आहे. पण याचा वापर मर्यादित प्रमाणात करायला हवा. संपूर्ण चेहऱ्यावर ब्राँझर थापू नये. अगदी थोडंसं ब्राँझर घेऊन जबड्यालगत कपाळाच्या कडेला आणि नाकाच्या दोन्ही बाजूंना लावा. आवश्यकतेनुसार जास्तीचं ब्राँझर लावता येईल. पण एकाच वेळी जास्त ब्राँझर घेणं टाळा. * भुवयांचं ग्रुमिंग करताना त्यांच्या रंगाशी साधर्म्य साधणाऱ्या उत्पादनांचा वापर करा. भुवयांना जाडसर लूक देण्यासाठी जेल, पेन्सिल किंवा पावडर कशाचाही वापर केला तरी फार गडद रंग निवडू नका. यामुळे तुमच्या भुवया बनावट दिसू शकतात. तुमचा नैसर्गिक लूक बिघडू शकतो. त्यामुळे भुवयांचा मेक अप हलक्या हातांनी करा. * नैसर्गिक गुलाबी गाल सौंदर्याचं आणि उत्तम आरोग्याचं प्रतिक ठरतात. त्यामुळे ब्लश वापरताना हा नैसर्गिक लूक टिकायला हवा. त्यामुळे स्कीन टोनला साजेसा ब्लश विकत घ्या. गोऱ्या तसंच गव्हाळ वर्णाच्या महिला रोझी पिंक तसंच पिच रंगाच्या शेड्स वापरू शकतात. न्यूड, लाल, ब्राउन रंगाचे ब्लश सावळ्या महिलांवर शोभून दिसतात.

### पंचांग

**शनिवार, १८ एप्रिल २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, वैशाख शु. १, चंद्रराशी : मेष, नक्षत्र : अश्विनी, योग : प्रीति, सूर्योदय ६.२२, सूर्यास्त ६.५५

### फॉरवर्ड्स

**हमारी ख़ामोशियों के राज़ ख़ुद हमें ही नहीं मालूम...**

**जानें क्यों लोग़ हमें मग़रूर समझतें है...!**

### करीअर ग्रोथ

* स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करा. आजपासून दहा वर्षांनी तुम्हाला तुमच्यात अपेक्षित असलेल्या बदलांची यादी करा. शांतता, सुख, समाधान हवं असेल तर दगदग, धावपळ यापासून तुम्ही लांब रहाल. * दहा वर्षांनंतरच्या नोकरीच्या स्थानाचा विचार करा. तुम्हाला स्वत:ला कोणत्या पदावर बघायला आवडेल, हे ठरवून ठेवा. त्या दृष्टीने प्रयत्न करा. * आर्थिक सुबत्तेचा विचार प्रत्येकाच्या मनात असतो. आपल्याला कसं आयुष्य जगायचं आहे, कोणती भौतिक सुखं हवी आहेत, किती संपत्ती असायला हवी याचा विचार करा. त्यानुसार करीअरमध्ये पुढे जायला हवं.

### करिअरवाटा — लॉ मध्येही स्पेशलायझेशन

हा काळ स्पेशलायझेशनचा असला तरी अद्याप कायद्याच्या क्षेत्रामध्ये स्पेशलायझेशनचा म्हणावा तेवढा बोलबाला झालेला नाही. फौजदारी आणि मुलकी खटले हाताळणारे वकील असं ढोबळ वर्गीकरण या क्षेत्रात रूढ आहे. परंतु आता विशिष्ट कायद्यांचा विशेष अभ्यास करून त्यातच



करिअर करण्याची कल्पना पुढे येत आहे. पर्यावरणविषयक कायदे, आरोग्यविषयक कायदे, ग्राहकांच्या विषयीचे कायदे, कंपन्यांच्या व्यवहाराविषयीचे कायदे अशा विविध शाखा विकसित होत आहेत. त्यामुळे कायद्याची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेताना यातल्या कोणत्या तरी एका विषयाचे स्पेशलायझेशन करण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा आहे. काळाची ही गरज ओळखून विविध विद्यापीठांनी असे विशेष अभ्यासक्रम सुरू केले आहेत आणि भारतातली काही विद्यापीठे त्यासाठी प्रसिद्धही आहेत. दिल्लीतील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी या विद्यापीठामध्ये अशा विशिष्ट अभ्यासक्रमांची योजना आहे. तिथे इन्टेलेक्च्युअल प्रॉपर्टी ॲक्ट, एनर्जी ॲक्ट, व्हेंच्युअर कॅपिटल ॲक्ट अशा वेगळ्या कायद्यांचे अभ्यासक्रम आहेत. मल्टिनॅशनल कंपन्या नियमितपणे वकिलाचा सल्ला घेत असल्यामुळे संधीचा फायदा घेऊन लॉ फर्मस कार्यालये स्थापत आहेत.

### खेचाखेची — खराब आंबे

**सौ. पुणेकर**: मला सगळे सडके, खराब आंबे द्या.
**आंबेवाला** : खराब ???
**सौ. पुणेकर** : हो हो. खराब, नासके आणि सडके !
**आंबेवाला** : (सर्व खराब आंबे एकत्र करून) हे घ्या...
**सौ. पुणेकर** : हं . ठेवा बाजूला... आता उरलेल्या पैकी अर्धा डझन द्या !

आंबेवाल्याने खराब आंब्याचा रस पिऊन जीव दिला.

### वेगळं काही

जपानमध्ये शिकोकू बेटांवर नागोरो हे गाव वसलं आहे. ६९ वर्षांच्या महिलेने संपूर्ण गावात २७० पुतळे बसवले आहेत. लोकांना एकटं वाटू नये यासाठी तिने ही कल्पना लढवली. याच कारणामुळे नागोरोला पुतळ्यांचं गाव असंही म्हणतात. या गावातले बरेच लोक शहरात निघून गेले आहेत. इथे राहणारी सर्वात लहान वयाची व्यक्ती ५५ वर्षांची आहे. इथे फक्त २७ लोक उरले आहेत. निर्जन होत चाललेलं हे गाव वाचवण्यासाठी आयनो सुकिमी नावाच्या महिलेने इथे पुतळे बसवायचं ठरवलं. यामुळे तरी लोक गावात थांबतील, रस्त्यावर दिसतील असं तिला वाटायचं. आयनोने गावातल्या शाळा, बसस्थानकं, किराणा सामानाची दुकानं आणि मैदानांमध्ये हे पुतळे बसवले आहेत.

### फॅशन पॅशन — अंतर्वस्त्र निवडताना...



अंतर्वस्त्रांची खरेदी काळजीपूर्वक आणि पुरेसा वेळ हाती ठेवून करावी. अंतर्वस्त्रांचं फिटिंग योग्य असेल तरच पेहराव उठून दिसतो. पण बरेचदा ही काळजी घेतली जात नाही. डीप नेक ड्रेस परिधान करताना चुकीची ब्रा घातली जाते आणि हसं होतं. हे टाळायचं तर काय करावं?

* डीप नेकलाईन ड्रेससाठी ब्रा ऐवजी डक्ट टेपचा उपयोग करावा. ब्रेस्टलाईन जास्त असणाऱ्या महिलांसाठी हा सर्वोत्तम पर्याय आहे. पण टेप काढताना काळजी घ्यावी. यात चूक झाली तर त्वचेला हानी पोहोचू शकते. * बॅक एक्सटेंड स्ट्रीप्स खालच्या बाजूने ब्रा ची उंची खेचतात. त्यामुळे डीप नेकलाईन ड्रेसमध्ये हूक दिसून येत नाहीत. लो बॅक किंवा हॉल्टर गाऊन्ससाठी बॅक एक्सटेंड स्ट्रीप्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. * ड्रेस बॅकलेस असेल आणि नेकलाईनही डीप असेल तर ब्रा ऐवजी सिलिकॉन पेस्टीचा पर्याय उत्तम आहे. या पेस्टीज ब्रेस्टवर चिकटवायच्या असतात. यामुळे ड्रेसला समोरून स्मूथ फिनिशिंग मिळतं त्याचबरोबर पॅडिंग सपोर्टही मिळतो. * डीप नेकलाईन आणि समोरून शीर फॅब्रिकचं मिक्स्चर असेल तर प्लंज ब्रा वापरावी.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ पान ३


## अर्ज़ किया है...

*तुझ से मिलने का रास्ता बस एक*
*और बिछड़ने के रास्ते हैं बहुत*

**- साकी फारुकी**

शायर म्हणतात की, तुला भेटण्यासाठी किंवा तुझ्यापर्यंत पोहोचण्यासाठी फक्त एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे 'प्रेम' किंवा 'समर्पण'. एखाद्या व्यक्तीशी नाते जोडण्यासाठी मनाची ओढ आणि एकनिष्ठता लागते, जो एक अत्यंत कठीण आणि अरुंद मार्ग आहे. पण एकदा का ते नाते तुटायला लागले, तर त्याची कारणे हजार असू शकतात.

## मनपा निवडणुकीच्या वादातून बांधकाम व्यावसायिकावर हल्ला

**समाचार/नगर-दि.१७**

महापालिका निवडणुकीच्या जुन्या वादातून एका बांधकाम व्यावसायिकावर लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना तपोवन रोड परिसरात घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सागर दत्तात्रय ढवण (वय ३८, रा. तपोवन रोड) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अजय उर्फ विकी दिलीप ढवण, ऋषीकेश सुनील ढवण, सागर पोपट पोळ, मयूर सुरेश वुळ आणि विजू बहीरु शिंदे (सर्व रा. ढवण वस्ती) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. सागर ढवण यांचे इंडो आयरीश हॉस्पिटल शेजारी नवीन बांधकाम सुरू आहे. मंगळवारी सायंकाळी ढवण तिथे असताना सर्व आरोपी त्या ठिकाणी आले. तुम्ही आम्हाला महापालिका निवडणुकीत खूप त्रास दिला आहे, असे म्हणून आरोपींनी ढवण यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी जवळ असलेल्या लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने ढवण यांना बेदम मारहाण केली. यावेळी विकी ढवण याने पंच्याने फिर्यादीचा गळा आवळून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. पुढील तपास तोफखाना पोलिस करीत आहेत.

# निवडणूक खर्च तपासणी मोहीम अधिक काटेकोरपणे करा- व्ही. कुमार

**समाचार/नगर-दि.१७**



राहुरी विधानसभा मतदार संघाच्या पोटनिवडणुकीस अवघे सहा दिवस शिल्लक असताना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पडावी यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक दक्षपणे व संवेदनशीलतेने काम करावे. तपासणी मोहीम अधिक काटेकोरपणे करण्याचे निर्देश खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी दिले. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित खर्च आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, लेखाधिकारी नागरे, उत्पादन शुल्क अधीक्षक प्रमोद सोनोने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

व्ही. कुमार म्हणाले, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात यावे. अवैध रोकड व मद्य वाहतुकीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे.

मतदारांना कुठल्याही प्रकारचे प्रलोभन दिले जात नाही ना, याची काटेकोर तपासणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. एफएसटी, व्हीएसटी व एसएसटी पथकांनी अधिक सक्रिय राहून मतदारसंघात येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करावी. तसेच, निवडणूक कायदे व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करत नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करून प्रभावी कामकाज करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

## निधन वार्ता

### गयाबाई निरफराके

**समाचार/नगर-दि.१७**



माळीवाडा येथील रहिवासी श्रीमती गयाबाई पांडुरंग निरफराके यांचे नुकतेच विधान झाले मृत्यू समयी त्यांचे ८० वय होते. त्याचे मागे दोन मुले ,सुना ,नातवंडे ,असा परिवार आह. गयाबाई निरफराके या भाजीपाला विक्री चा व्यवसाय करून आपल्या कष्टाने मुलांचे संगोपन करून त्यांना मोठे केले त्यांना भजनाची विशेष आवड होती तसेच स्नायडर इलेक्ट्रिक येथील राजेश निरफराके आणि पुणे येथील किर्लोस्कर न्यूमॅटिक येथील गणेश निरफराके यांच्या मातोश्री होत्या.

### यशवंत नवले

**समाचार/नगर-दि.१७**



नवीपेठेतील रहिवासी व प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक यशवंत नामदेवराव नवले (वय ७१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. पूर्वीच्या हॉटेल अंकुरचे चालक असलेले स्व. नवले हे धार्मिक व मनमिळावू स्वभावाचे होते. नुकतीच त्यांनी नर्मदा परिक्रमा पायी पूर्ण केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### देविदास कुलकर्णी

**समाचार/नगर-दि.१७**




येथील सावेडी भागातील चैतन्य बॅटरी व सोलर तसेच चैतन्य ट्रॅव्हल्सचे संचालक शिरीष कुलकर्णी यांचे वडील देविदास नारायण कुलकर्णी (वय ८०) यांचे अल्प आजाराने १५ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, दोन विवाहित मुले, विवाहित कन्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.परिवार आहे.

# 'स्नेहालय'चे वार्षिक बा, बापू, विनोबा, आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



शबाना अख्तर



कावेरी आणि दीपक नागरगोजे



संदीप आणि भक्ती परब

**समाचार/नगर-दि.१७**

स्नेहालय संस्थेचे वर्ष २०२५ - २६ चे बा, बापू , विनोबा आणि आदर्श शिक्षक पुरस्कार आज जाहीर करण्यात आले. येत्या रविवारी, १९ एप्रिल रोजी अक्षय तृतीयेचे औचित्य साधून पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन संस्थेने केले आहे. पद्मश्री डॉ. अभय बंग, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ.सुरेश पठारे यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी १० वाजता औद्योगिक वसाहतीमधील स्नेहालय पुनर्वसन संकुल येथे हा पुरस्कार वितरण सोहळा होईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे . सामाजिक क्षेत्रातील कर्मयोग्यांशी संवादाची संधी यामुळे सर्वांना मिळते आहे.

बा (कस्तुरबा गांधी) पुरस्कारासाठी हावडा (बंगाल) येथील समरिटन हेल्प मिशन या संस्थेच्या सहसंस्थापिका शबाना मामुन अख्तर यांची निवड करण्यात आली. मागील ३ दशकात त्यांनी ५० आजारांवर बालकांना शिक्षण आणि महिलांना रोजगार कौशल्यासह सक्षम केले.

बापू ( महात्मा गांधी )पुरस्कारासाठी तळ कोकणातील जीवन आनंद या संस्थेचे संस्थापक दांपत्य भक्ती आणि संदीप परब यांना निवडण्यात आले. मागील २० वर्षात त्यांनी १० हजारांवर मनोरुग्ण ,अनाथ आणि निराधार यांचे उपचार आणि पुनर्वसन केले. राष्ट्रसंत विनोबा पुरस्कार आर्वी ( जिल्हा बीड) येथील शांतीवन प्रकल्पाचे संस्थापक कावेरी आणि दीपक नागरगोजे या दांपत्याला जाहीर करण्यात आला. अनाथ ,वंचित आणि विशेषतः ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय त्यांनी २५ वर्षांपासून केली. आर्वी परिसर जलसमृद्ध करून येथील विस्थापन कायमचे रोखले.

आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत वैश्विक दर्जाचे शिक्षण देणारे दत्तात्रय वारे गुरुजी, नगरच्या झोपडपट्ट्यात शालाबाह्य मुलांना शिक्षणाची गोडी लावणारे सचिन वैजनाथ वाघ आणि स्नेहालय इंग्रजी माध्यम शाळेत विशेष गरजयुक्त बालकांसाठी मातृभावनेतून शिकवणाऱ्या चंद्रकला कराळे यांची निवड करण्यात आली.

बा,बापु आणि विनोबा पुरस्कार प्रत्येकी ५०,०००/- तर आदर्श शिक्षक पुरस्कार प्रत्येकी १० हजार रुपयांचे आहेत. पुस्तके , सन्मानपत्र , स्मृतिचिन्ह इ. चाही यात समावेश असतो. पुरस्कारप्राप्त कार्यकर्त्यांच्या संस्थांशी आणि कार्याशी स्नेहालय आपले देणगीदार आणि संसाधने यानिमित्ताने जोडून देते. सेवा संवर्धन कार्यशाळेच्या माध्यमातून अशा संस्थांच्या सक्षमीकरणात आणि शाश्वतीकरणात हातभार लावते .वर्ष १९९५ पासून आजवर ६०० हून अधिक सामाजिक संस्थांना आणि कार्यकर्त्यांना अशा पुरस्कारांद्वारे स्नेहालय प्रोत्साहित करीत आले असल्याचे संस्थेच्या अध्यक्षा जयाताई जोगदंड यांनी सांगितले.या पुरस्कारांसाठी पुणे येथील आदर्श शिक्षिका स्वर्गीय इंदिरा आणि माजी आमदार श्यामकांत मोरे तसेच शिक्रापूर येथील स्वर्गीय सीताबाई आणि रावसाहेब मांढरे यांच्या कुटुंबीयांनी आर्थिक सहयोग दिला. या संदर्भात अधिक माहितीसाठी ७७७००२७५०५ येथे संपर्काचे आवाहन स्नेहालयाने केले आहे.

## पान १ वरुन

### जिल्ह्यात उष्मालाटेचा 'यलो अलर्ट'

रुग्णांपैकी दोन रुग्ण बुधवारी आढळले. गडचिरोली, गोंदिया, जळगाव, नंदुरबार, नाशिक आणि रायगड या जिल्ह्यांत प्रत्येकी एका रुग्णाची नोंद झाली.एप्रिल महिन्यात तापमानाचा पारा वाढत असून, अनेक ठिकाणी तो ४० अंशांपुढे गेला आहे. दुपारी उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत असल्याने नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. विशेषतः उन्हात दीर्घ काळ काम करणारे मजूर, बांधकाम क्षेत्रातील कामगार, शेतकरी; तसेच रस्त्यावर काम करणाऱ्या व्यक्तींना उष्माघाताचा धोका अधिक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. दरम्यान, नगर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले असून, पुढील काही दिवस कडक ऊन आणि उकाडा कायम राहण्याची शक्यता आहे. प्रशासनाने नागरिकांना दुपारी घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असून, अंगाची लाहीलाही होत आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढू लागली आहे. सकाळपासूनच सूर्य आग ओकत आहे. सकाळी आठ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका बसू लागला आहे. दुपारी १२ वाजल्यानंतर ही परिस्थिती अधिकच तीव्र झालेली असते. तापलेले रस्ते आणि उन्हाची तीव्रता यामुळे घराबाहेर पडलेल्या नागरिकांबरोबरच दुचाकी चालकांची लाहीलाही होत आहे.

### ठाकरेसेनेत इच्छुकांची भाऊगर्दी

ठाकरेसेनेला यापूर्वीच पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे ठाकरेसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा विधानपरिषदेवर जाणार का, याची राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आहे. ठाकरे यांनी पुन्हा विधानपरिषदेवर जावे, असाच ठाकरेसेनेच्या प्रमुख नेत्यांचा आग्रह आहे. त्यातच आता काँग्रेसकडूनही विधानपरिषदेच्या जागेसाठी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासह मुझफ्फर हुसेन, सचिन सावंत यांची नावे चर्चेत आली आहेत. अर्थात उद्धव ठाकरे यांनी ही निवडणूक लढविल्यास काँग्रेस त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचीही शक्यता आहे. ठाकरेसेनेकडून पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे, माजी खा. विनायक राऊत, राजन विचारे, अंबादास दानवे, माजी आ. वैभव नाईक आदिंची नावे विधानपरिषदेसाठी चर्चेत आली आहेत.

### माजी मंत्री प्राजक्त तनपुरे देणार भाजपाला पाठिंबा?

याविषयी मतदारसंघात गेले काही दिवस चर्चा होते आहे. दरम्यानच्या काळात माजी मंत्री तनपुरे भाजपात जाणार असल्याचीही चर्चा झाली, मात्र तनपुरे यांनी ही चर्चा फेटाळून लावत आपण शरद पवार राष्ट्रवादी आणि महाविकास आघाडीतच असल्याचे सांगितले. आगामी २०२९ च्या निवडणुकीत आपण ताकदीने उतरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे तनपुरे यांनी आताच्या पोटनिवडणुकीत भाजपा महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांना पाठिंबा देऊन त्यांच्या प्रचारात सहभागी व्हावे, यासाठी भाजपा नेत्यांनीच प्रयत्न चालविले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या २० तारखेला कर्डिले यांच्या प्रचारार्थ राहुरीत येत असून मुख्यमंत्र्यांसह भाजपा नेत्यांकडून तनपुरे यांना भाजपाला पाठिंबा देण्याचे आवाहन केले जाण्याची चिन्हे आहेत. विशेष म्हणजे याचदिवशी तनपुरे यांनी कार्यकर्त्यांची बैठक घेऊन पोटनिवडणुकीत कोणती भूमिका घ्यायची, हे ठरविले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या राहुरी दौऱ्याच्या निमित्ताने माजी मंत्री तनपुरे हे या निवडणुकीत तालुक्याच्या विकासाच्या मुद्द्यावर भाजपा महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांना पाठिंबा जाहीर करतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### अ‍ॅपे रिक्षातून विदेशी दारूची वाहतूक पकडली

योगेश कर्डीले, बाळासाहेब गुंजाळ, अमृत आढाव, उत्तरेश्वर मोराळे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पथकास संगमनेर ते अकोले रोडवर एक विना नंबरची अ‍ॅपे रिक्षा उभी असल्याची दिसून आली. पथकाने रिक्षा चालकास त्याचे नाव विचारले. सुनिल रामनाथ मोरे (वय ४२, रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर) असे असल्याचे सांगितले. पथकाने सदर अ‍ॅपे रिक्षाची पाहणी केली असता, रिक्षामध्ये विदेशी दारुचे बॉक्स आढळून आले. त्याने सदरची दारु गणेश पंढरीनाथ मोरे (रा. पिंपळगाव कोझींरा, ता. संगमनेर) (पसार) यांची असून त्याच्या सांगण्यावरुन ते वेदांत वॉईन्स शॉप, संगमनेर नाशिक रोड येथून खरेदी करुन आणलेली असल्याची माहिती सांगितली. ७२ हजार रुपये किमतीची विदेशी कंपनीची दारु तसेच ३ लाखाची अ‍ॅपे रिक्षा असा एकुण ३ लाख ७२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

### महिला व बालविकास योजनेत नगर जिल्हा आघाडीवर

मिळाली असून, पुढील एक ते दीड वर्षांत इमारत पूर्ण होण्याची शक्यता आहे. या इमारतीत सर्व कार्यालये एकाच छताखाली उपलब्ध होऊन नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सेवा मिळणार आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत जिल्ह्यात ११ लाख ३९ हजार लाभार्थ्यांना फेब्रुवारीपर्यंत लाभ वितरित करण्यात आला आहे. जिल्ह्यात सखी वन स्टॉप सेंटर व महिला सक्षमीकरण केंद्र कार्यरत असून, जिल्हा रुग्णालय परिसरात सखी केंद्राची प्रशस्त इमारत आहे. संगमनेर येथे शक्ती सदन व सखी केंद्र सुरू असून अडचणीत आलेल्या महिलांना मदत दिली जाते. तसेच पिंक ई-रिक्शा योजनेद्वारे गरजू महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यात मदत केली जात आहे.

# मसापच्या पुणे विभागीय कार्यवाहकपदी येलुलकर

**समाचार/नगर-दि.१७**



महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे च्या विभागीय कार्यवाह पदी जयंत येलुलकर यांची एकमताने निवडमराठी भाषेची पालक संस्था असलेल्या पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विभागीय कार्यवाह पदी अहिल्यानगरचे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे जिल्हा प्रमुख जयंत येलुलकर यांची एकमताने निवड झाली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या काल परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे निवडून आलेल्या नूतन कार्यकारिणीच्या बैठकीत या महत्वाच्या पदाची घोषणा करण्यात आली.श्री येलुलकर यांनी म.सा.प च्या माध्यमातून जिल्ह्यातील साहित्य चळवळ गतिमान करण्यासाठी मोलाचे प्रयत्न केले असून त्यांच्या कार्यकाळात अहिल्यानगर येथे विभागीय साहित्य संमेलन, राज्य स्तरीय युवा साहित्य नाट्य संमेलन, बाल साहित्य संमेलनाचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. या संमेलनास जिल्ह्यातून तसेच राज्यातून साहित्य रसिकांचं मोठा प्रतिसाद मिळाला होता.

नगर येथे नुकत्याच झालेल्या राज्य युवा साहित्य संमेलनात संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल राज्याचे उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी येलुलकर यांचे खास कौतुक केले होते. येलुलकर संपादक असलेल्या म.सा.प सावेडी उपनगर शाखा व शांतिकुमार फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन यांच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून प्रकाशित करण्यात येणाऱ्या वारसा दिवाळी अंकास चार वेळेस राज्य पुरस्काराने गौरविण्यात आले असून जिल्ह्यातील तसेच राज्यातील तरुण साहित्यिक, कवींच्या तसेचज्येष्ठ साहित्यिकांच्या प्रतिभेला संधी देण्याचे काम वारसा दिवाळी अंकातून होत असते.विविध उपक्रमांच्या माध्यमातून जिल्ह्यातील साहित्य चळवळ समृद्ध करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत येलुलकर यांना २०२५ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेने प्रतिष्ठेच्या रत्नाकर कुलकर्णी स्मृती कार्यकर्ता पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

अध्यक्ष योगेश सोमण म्हणाले की, साहित्य क्षेत्रातील येलुलकर यांचे योगदान प्रशंसनीय असून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या भविष्यातील अनेक योजना,उपक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा, मनापासून काम करण्याच्या स्वभावाचा उपयोग होईल. त्यांच्या या पदाला ते नक्कीच न्याय देतील व संधीचे सोने करतील असा विश्वास वाटतो. यावेळी प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

## मालतीबाई कुलकर्णी यांचे निधन

**समाचार/नगर-दि.१७**



शेवगाव तालुक्यातील भावी निमगाव येथील जुन्या पिढीतील मालतीबाई माधवराव कुलकर्णी (निमगांवकर) यांचे बुधवारी, दि. १५ रोजी आकस्मिक निधन झाले. त्या ८५ वर्षांच्या होत्या. कडक व शिस्तीच्या असणाऱ्या मालतीबाईंचा गावातील सर्वांना मायेचा आधार होता. सर्वांशी मिळून मिसळून राहुन, प्रत्येकाच्या सुख दु:खात त्या सहभागी असायच्या. त्या पंचक्रोशीत 'जीजी' नावाने परिचित होत्या. त्यांच्या निधनाने भावी निमगाववर शोककळा पसरली आहे.

त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नगर शहरातील प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक व मार्क कन्स्ट्रक्शनचे संचालक मकरंद कुलकर्णी, राजकीय व सामाजिक नेते मिलिंद कुलकर्णी व जलसंपदा विभागातील उपअभियंता महेश कुलकर्णी यांच्या त्या मातु:श्री होत्या. त्यांच्या पार्थिवावर दि. १६ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.


**समाचार** वाचकांना नम्र सूचना

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**विप्रोची फेर खरेदीची घोषणा**

**प्रतीशेअर २५० रु.**

**सेन्सेक्स घोडदौड ३५० ने वाढ**

अशोक पटवा हजार
(शेअर सबब्रोकर)
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९६१

**दिनांक १७-४-२०२६**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७८३०४ |
| एसीसी | १४२९-३० |
| एशियन पेंट | २४७७-७८ |
| बजाज ऑटो लि. | ९७६०-६१ |
| बलराम फूड चिनी | ४८४-८५ |
| भारत फोर्ज | १८६५-६६ |
| क्रॉम्प्टन | २६१-६२ |
| डीएलएफ | ५९९-६०० |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२२९-३० |
| ग्रॅफाईट इंडिया | ६८१-८२ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२३६-३७ |
| आयटीसी लि. | ३०६-०७ |
| एल ॲण्ड टी लि. | ४१०१-०२ |
| रिलायन्स इंड. | १३६२-६३ |
| एसबीआय | १०७१-७२ |
| टाटा मोटर्स | ३६०-६१ |
| टाटा स्टील | २११-१२ |
| टीसीएस | २५७६-७७ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १४१-४२ |
| कोव्हान्स फार्मा | ३८८-८९ |

### डाक विभागाची दमदार कामगिरी

# क्रिकेट लीगद्वारे अनोखा यशोत्सव

**समाचार/नगर-दि.१७**

अहिल्यानगर डाक विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरीची नोंद करत आगळावेगळा यशोत्सव साजरा केला. बचत बँक (POSB) अंतर्गत तब्बल ११२००० निव्वळ खातेवाढ साध्य करण्यात आली, तर टपाल जीवन विमा (झडख/ठझडख) अंतर्गत ६ कोटी ६० लाख रुपयांचा प्रीमियम संकलित करण्यात आला. या उल्लेखनीय यशामुळे विभागाच्या कार्यक्षमतेचा गौरव अधिक उंचावला आहे.

या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी सावेडी येथील राजस्व स्पोर्ट्स क्लबमध्ये अहिल्यानगर पोस्टल क्रिकेट लीग स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची



सुरुवात प्रवर अधीक्षक डाकघर अहिल्यानगर विकास पालवे यांच्या हस्ते केक कापून करण्यात आली.

यानंतर टरफ मैदानावर क्रिकेट स्पर्धांना सुरुवात झाली. या स्पर्धेत ८ पुरुष संघ आणि २ महिला संघांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

विकास पालवे म्हणाले की, ही स्पर्धा कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामाच्या ताणातून दिलासा देण्याबरोबरच उत्साह, संघभावना आणि खेळाडूवृत्ती वाढवणारी आहे. यामुळे दैनंदिन कामकाजात समन्वय, एकजूट आणि सकारात्मकता अधिक बळकट होईल. याच सकारात्मक ऊर्जेच्या बळावर डाक विभाग आगामी काळातही अधिक यश संपादन करेल. असा सार्थ विश्वास त्यानी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला बँक ऑफ महाराष्ट्रचे रवीरंजन प्रक्षुन यांची प्रमुख उपस्थिती होती.

यांचे सह अमृत कुमटकर, रविकुमार झावरे, राजेश नेहरकर, हनुमंत चव्हाण, सोमनाथ तांबे, विनायक शिंदे,संतोष यादव यांच्यासह मोठ्या संख्येने डाक कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविक अमृत कुमटकर यांनी केले, सूत्रसंचालन महेश थिटे व स्पर्धेचे समालोचन राज मोहम्मद शेख यांनी तर आभार प्रदर्शन हनुमंत चव्हाण यांनी मानले.

# चैतन्य टेक्नो विद्यालयात गुणवंतांचा गौरव



**समाचार/नगर-दि.१७**

दहावीच्या बोर्ड परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्यासाठी जाधव नगर, नगर-कल्याण रोड येथील उद्धव अकॅडेमी संचालित श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये विशेष सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी इयत्ता दहावीतील टॉप १०' गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला उद्धव अकॅडेमीच्या माजी प्राचार्या निशिता जाधव तसेच सचिव ॲड. जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या प्राचार्या के. अन्सी, डीन के. सुमन सर, शाखा विस्तार अधिकारी शशी कुमार, समन्वयिका पायल खंडेलवाल, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांच्या यशामागील शिक्षकांचे परिश्रम व पालकांचे सहकार्य अधोरेखित केले. शाळेचा १०० टक्के निकाल कायम राखल्याबद्दलही समाधान व्यक्त करण्यात आले. निशिता जाधव यांनी प्राचार्या, डीन व शिक्षकवृंद यांच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशीच यशस्वी वाटचाल कायम ठेवावी, असा विश्वास व्यक्त केला. पालकांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या यशामागे शाळेचा मोलाचा वाटा असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनीही आपले अनुभव सांगत शिक्षकांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

## अभिषेक कळमकर यास हजर होण्याबाबत पोलिसांकडून जाहीरनामा

**समाचार/नगर-दि.१७**

महिला अत्याचार गुन्ह्यातील आरोपी माजी महापौर अभिषेक कळमकर यास हजर होण्याबाबत पोलिसांकडून जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला आहे. कळमकर याच्याविरूध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. कळमकर हा मिळून येत नसल्याने त्याच्याविरूध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ७५ प्रमाणे स्टँडिंग वॉरंट काढण्यात आले होते. स्टँडिंग वॉरंट सर्व जिल्हयांमध्य पाठवून आरोपीचा शोध घेण्यात आला परंतु तो मिळून आला नाही. न्यायालयाने आरोपीस हजर होण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ८४ प्रमाणे जाहीरनामा क ाढून तो सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्द करण्याचे आदेशित केले आहे. कळमकर यास न्यायालयासमोर हजर होण्याबाबत आदेश दिलेले असून न्यायालयासमोर हजर न राहिल्यास त्यास फरार आरोपी म्हणून घोषित करण्यात येणार असल्याबाबत नमूद करण्यात आले आहे, असे पोलिस प्रशासनाने म्हटले आहे.

### वाहेगुरु सेवा ग्रुपचा प्रेरणादायी समाजसेवा उपक्रम

# बैसाखीनिमित्त दिव्यांगांना मदतीचा हात

**समाचार/नगर-दि.१७**

अहिल्या नगर येथे वाहेगुरु सेवा ग्रुपच्या वतीने बैसाखीच्या पवित्र निमित्ताने दिव्यांग बांधवांसाठी एक प्रेरणादायी समाजसेवा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत गरजू दिव्यांगांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.यावेळी राजू सिंग धुप्पड, डॉ. वैजनाथ गुराऊळे, गुरले अवतार, अमर सावंत, डॉ. संदीप कलमकर, यश सुखीजा, अशोक खुबचंदाणी, जितेंद्र कपूर, राकेश गुलाटी, निप्पू सिंग दुपर, नीतूजी धुप्पड, बबलू खोसला ,संभाजी भोर, अनिल चाबुकस्वार, महेश पांडुळे आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.



अशोक खुबचंदाणी यांनी सांगितले की समाजसेवा ही केवळ कर्तव्य नसून ती एक पवित्र भावना आहे. वाहेगुरु सेवा ग्रुपच्या माध्यमातून बैसाखीच्या शुभ निमित्ताने दिव्यांग बांधवांसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम मनाला स्पर्श करणारा आहे. गरजूंना मदतीचा हात देताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद हेच आमच्यासाठी खरे समाधान आहे.

या छोट्याशा प्रयत्नातून समाजात माणुसकी, सहकार्य आणि आपुलकीची भावना अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा आहे. पुढील काळातही अशाच प्रकारचे उपक्रम राबवून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा आमचा निर्धार आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे. या उपक्रमामुळे गरजू दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले असून, समाजात एकात्मता व सहकार्याची भावना अधिक दृढ झाली आहे. भविष्यातही असेच प्रेम, पाठबळ आणि आशीर्वाद मिळत राहतील अशी अपेक्षा वाहे गुरु च्या वतीने करण्यात आली.

# संजय पांडेय निर्मित 'ढसाळ' १ ऑक्टोबरपासून मोठ्या पडद्यावर!

दलित पँथर आणि विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित 'ढसाळ' या बहुप्रतीक्षित चरित्रपटाची घोषणा झाल्यापासून प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर या प्रतिक्षेला पूर्णविराम मिळाला असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती'च्या निमित्ताने या चित्रपटाचे भव्य पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. मुंबईत हजारोंच्या उपस्थितीत हा भव्य सोहळा पार पडला. यावेळी चित्रपटाच्या प्रदर्शनाची अधिकृत तारीखही जाहीर करण्यात आली असून, येत्या १ ऑक्टोबर २०२६ मध्ये हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे.




'ढसाळ'मध्ये ललित प्रभाकर हे नामदेव ढसाळ यांच्या भूमिकेत झळकणार असून, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमधून त्यांच्या लूकची प्रभावी झलकही समोर आली आहे. ललित प्रभाकर यांच्या या भूमिकेकडे सर्वांचे विशेष लक्ष लागले असून, त्यांनी साकारलेला ढसाळांचा बंडखोर आणि तडफदार आविष्कार प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

संजय पांडेय आणि दि बायोस्कोप फिल्म्स प्रस्तुत वरुणा मदनलाल राणा निर्मित या चित्रपटात दलित पँथर चळवळीचे प्रणेते, विद्रोही कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या संघर्षमय आणि ज्वलंत जीवनप्रवासाचे वास्तववादी चित्रण पाहायला मिळणार आहे. वरुणा राणा लिखित व दिग्दर्शित आणि प्रताप गंगावणे यांच्या प्रभावी संवादांनी सजलेल्या या चित्रपटातून अन्याय आणि शोषणाविरुद्ध नामदेव ढसाळ यांनी उभारलेला लढा, त्यांच्या लेखणीतून पेटलेली क्रांती आणि समाजमनाला हादरवून टाकणारे विचार यांचा ठसा उमटणार आहे. या चित्रपटात ललित प्रभाकर यांचे नामदेव ढसाळांच्या रूपात रूपांतर प्रख्यात रंगभूषाकार श्रीकांत देसाई यांनी केले आह.

# 'दीपज्योती'त गिरीश ओकांचा प्रभावी कमबॅक



झी मराठीवरील लाखात एक आमचा दादा' या मालिकेत आपली भूमिका गाजवल्यानंतर ज्येष्ठ अभिनेते गिरीश ओक आता दीपज्योती' मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. गिरीश ओक यांनी त्यांच्या भूमिकेबद्दल आणि मालिकेच्या अनुभवाबद्दल मनमोकळ्या गप्पा मारल्या. माझ्या व्यक्तिरेखेचं नाव आहे पुरुषोत्तम गायकवाड . पुरुषोत्तमची साड्यांची बरीच दुकानं आहेत, त्याचा साड्यांचा व्यापार आहे आणि तो त्यांनी शून्यातून उभा केलेला आहे. त्याने ही संपत्ती, व्यवसाय, साम्राज्य खूप मेहनतीने उभं केलेल आहे आणि आता मुलं हे सगळं सांभाळतील, असं त्याला वाटतंय. पुरुषोत्तम अतिशय तत्वनिष्ठ, सज्जन, कुठलाही वाईट व्यवहार न करणारा, मेहनतीने कमावणारा, सचोटीने वागणारा, लोकांना मदत करणारा, हळव्या मनाचा अशी त्याच्या भूमिकेची पार्श्वभूमी आहे. त्याची बायको जिवंत नाही, पण त्याच बायकोवर अतिशय प्रेम आहे.

मला सांगावस वाटतयत की मला अगदी नावाप्रमाणे भूमिका साकारायला मिळाल्यात, चांगली व्यक्तिरेखा म्हणजेच पुरुषोत्तम आणि वाईट खलनायकाची भूमिका म्हणजे कर्दनकाळ जालिंदर असं मला वाटत. गिरीश ओक यांची दीपज्योती' मधील ही सकारात्मक भूमिका प्रेक्षकांना नक्कीच भावेल. तेव्हा पाहायला विसरू नका 'दीपज्योती' १३ एप्रिलपासून दररोज रात्री ८ वा. सदैव तुमच्या झी मराठीवर.

## शब्दखेळ - ५३५

**खाली दिलेल्या चौकोनात शास्त्रीय संगीतातील एका घराण्याचे नाव लपलेले आहे, शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रि | क | वा | क | भे | वि | रो | य |
| कि | ग | पि | ण | आ | ता | ध | द |
| ण | ह | क | मी | ठ | र | म | णा |
| ता | गा | ळी | हि | त | रं | ल | ढा |
| वं | मा | थ | न | ल | ल | क्स | गी |
| म | क | व | ळी | ज | श | र | ळ |
| रु | ती | बा | बा | म | ट | की | चु |
| ला | नि | त्या | रा | न | बे | ड | न |

**शब्दखेळ - ५३४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | तु | जी | टा | सा | वा | प | ड |
| ह | सु | गो | प | खु | श | गो | ठा |
| श्री | गं | झो | स्व | कि | फ | य | झे |
| म | शा | बी | मा | ना | वं | या | न |
| च | न | कृ | ल | रा | न | ती | म |
| ली | स्टा | ल | प्र | व | हे | ज | र |
| म | व | ध | जा | प | क | ध | म |
| र | भि | श | त | के | चु | ब | त |

**उत्तर - श्रीधर फडके**

## शांतेचं कार्ट चालू आहे' पुन्हा रंगभूमीवर!



रंगभूमीवर काही नाटकं अशी असतात, जी प्रेक्षकांच्या मनात कायम घर करून राहातात. 'शांतेचं कार्ट चालू आहे' हे असंच एक गाजलेलं आणि आवडतं नाटक आता पुन्हा एकदा रंगभूमीवर परतत आहे. काही काळ विश्रांतीनंतर हे नाटक नव्या उत्साहात पुन्हा सादर होत असून, त्याचा प्रयोग रंगणार आहे. अमेय विनोद खोपकर सादर करत असलेले हे नाटक, एव्हीके पिक्चर्स आणि सीजी ग्रुप यांच्या निर्मितीतून साकारलं आहे. दिग्दर्शक विजय केंकरे यांच्या नेटक्या दिग्दर्शनातून आणि लेखक श्रीनिवास भणगे यांच्या खुसखुशीत लेखणीतून उभे राहिलेले हे नाटक प्रेक्षकांना पोट धरून हसवतानाच जीवनातील नातेसंबंधांवरही भाष्य करते. यात प्रियदर्शन जाधव, विक्रांत कोळपे, सुकन्या काळण, राजेश चिटणीस, प्रदीप जोशी, मयुरा रानडे आणि विशाखा सुभेदार यांसारखी लोकप्रिय कलाकारांची फळी पाहायला मिळणार आहे. कुटुंबातील छोट्या-मोठ्या प्रसंगांमधून उलगडणारे नातेसंबंध, त्यातील गंमती-जंमती, गैरसमज आणि आपुलकी यांचा हलकाफुलका वेध या नाटकातून घेतला जातो. त्यामुळेच हे नाटक प्रेक्षकांना हसवतानाच आपलेसेही वाटते. पूर्णपणे कौटुंबिक स्वरूपाचं असल्यामुळे, हे नाटक सगळ्यांनी एकत्र बसून पाहाण्यासारखे आहे.


लोकार्थ

संकलन-संयोजन

सुशीलकुमार

susheelkumar80@yahoo.com

# देऊळ बंद २ येतोय २१ मे २०२६ रोजी




२०१५ साली प्रदर्शित झालेल्या देऊळ बंद चित्रपटाला प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारा, किंबहून विज्ञानाचा आत्मा हा अध्यात्म आहे हे अधोरेखित करणाऱ्या तसेच श्री स्वामी समर्थ महाराज आणि वैज्ञानिक यांच्या भोवती फिरणाऱ्या कथेने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली त्यामुळे आजही देऊळ बंद आवर्जून बघितला जातो. देऊळ बंदचा अजून एक भाग यावा अशी इच्छा अनेक प्रेक्षकांनी व्यक्त केली होती आणि या इच्छेचा मान राखत लेखक, दिग्दर्शक प्रवीण विठ्ठल तरडे यांनी देऊळ बंद २ ची घोषणा केली होती. वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित देऊळ बंद २ चे डिजिटल पोस्टर समाज माध्यमांवर (सोशल मीडियावर) प्रदर्शित करण्यात आले आणि चित्रपट २१ मे २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होणार असल्याचे जाहीर झाले.आता परीक्षा देवाची असे उपशीर्षक असल्याने भक्तांसाठी देवाला कोणती परीक्षा द्यावी लागणार? याची उत्सुकता प्रेक्षकांना लागून राहिली आहे तसेच कोणते कलाकार कुठल्या भूमिकेत असणार आहेत? हे गुलदस्तात असल्याने ते जाणण्यासाठी रसिकांना अजून थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### सकारात्मक निर्णयाची अपेक्षा; अन्यथा आंदोलन-प्रा. शिंदे

# शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन

**समाचार/नगर-दि.१७**

राज्यातील शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष आणि अक्षम्य असंवेदनशीलतेच्या निषेधार्थ शिक्षक सेनेच्या वतीने शिक्षण अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

या आंदोलनाचे नेतृत्व शिक्षक सेना जिल्हाप्रमुख प्राध्यापक अंबादास शिंदे यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक सेना पदाधिकारी आणि जिल्ह्यातील अनेक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान विविध मागण्यांचे



निवेदन शिक्षण अधिकाऱ्यांना देण्यात आले.

शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांमध्ये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, थकित देयके तातडीने देणे, बी.एल.ओ.सारख्या अशैक्षणिक कामांपासून शिक्षकांना मुक्त करणे, परीक्षा काळातील पट पडताळणीची योग्य व्यवस्था, संच मान्यतेतील त्रुटी दूर करणे, मासिक वेतनातील विलंब थांबवणे, विनाअनुदानित शाळांचे स्वयंअर्थसाहाय्यीत शाळांमध्ये रूपांतर, दुबार पाळीतील रात्रशाळा शिक्षकांचे वेतन तसेच सी.एच.बी. शिक्षकांच्या वेतनवाढीचा प्रश्न यांचा समावेश होता.

प्रा. अंबादास शिंदे यांनी प्रशासनावर तीव्र शब्दांत टीका करत शिक्षकांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले, शिक्षक हा समाजाचा कणा असूनही आज त्यालाच मूलभूत हक्कांसाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. शासनाने शिक्षकांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नये, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

ते म्हणाले, शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा टाकून शिक्षण व्यवस्थेचा दर्जा खालावत आहे. शिक्षकांना त्यांच्या मूळ कामावर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. प्रलंबित देयके आणि वेतनातील विलंब हा शिक्षकांच्या सन्मानाला धक्का देणारा प्रकार आहे. यावर त्वरित तोडगा न निघाल्यास राज्यभर मोठे आंदोलन उभारले जाईल.या आंदोलनात शिक्षक सेना जिल्हा सचिव उद्धवराव सोनवणे, उपाध्यक्ष महेश कुलकर्णी, कार्याध्यक्ष रावसाहेब मस्के, विठ्ठलराव उरमूडे, शिक्षक नेते अविनाश साठे, शेख सर, प्रसाद शिंदे, बापू दुधाटे, सोमनाथ नजन, दिगंबर हरवा, नंदकुमार जाधव, अर्जुन आढाव, कोतकर सर, शिंदे सर, संकेत मस्के, रामलाल कर्डिले, विनायक आहेर, अजिंक्य गायकवाड, गणेश पोटभरे, तसेच युवा सेना उपजिल्हाप्रमुख महेश शेळके आदींसह बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते. निवेदनावर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी शिक्षकांनी व्यक्त केली.

# मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये उन्हाळी शिबीर

**समाचार/नगर-दि.१७**

हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये दिनांक २० एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत तीन वर्ष ते तेरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.उन्हाळ्याच्या सुट्टीत मनोरंजन आणि खेळातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक,शारीरिक व मानसिक विकास व्हावा.तसेच विद्यार्थ्यांचे कला गुण विकसित व्हावे.हस्तकला चित्रकला,विविध खेळ,योगा, इको फ्रेंडली ज्वेलरी बनवणे, फॅशन शो,अबॅकस यांचे प्रशिक्षण देणे.

फिटनेस की पाठशाळा या आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यासाठी विश्व मंगल आयुर्वेद चे संचालक डॉ. स्नेहलकुमार राहणे हे मुलांना आरोग्यविषयक माहिती देणार आहे.या शिबिरात नाडी परीक्षण कसे करावे,प्रथमोपचार तसेच निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी योग्य आहाराचे नियोजन कसे करावे.हे विविध खेळांच्या व मनोरंजनाच्या माध्यमातून सांगितले जाईल.

व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी, चांगले ज्ञान,संस्कार मिळावे या उद्देशाने या समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे यांनी केले आहे.उन्हाळी शिबिराच्या प्रवेशासाठी नोंदणी आवश्यक आहे.९९रुपये नाममात्र शुल्क आकारले जाईल.अधिक माहितीसाठी संपर्कःमो.नं. ८९५६६२७९२५ साधावा.

# पोदार स्कूलची दहावीची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम




**समाचार/नगर-दि.१७**

पोदार इंटरनॅशनल स्कूलचा (उइडए) इयत्ता दहावीचा सन २०२५-२६ चा निकाल यावर्षीही शंभर टक्के लागला असून, मागील तीन वर्षांची यशस्वी परंपरा शाळेने कायम राखली आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा नावलौकिक अधिक उंचावला आहे.यंदा बिनिश काझी हिने ९७.४० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. सई झावरे (९६.६० टक्के) हिने द्वितीय, तर वेदांत झावरे (९६.४० टक्के) याने तृतीय क्रमांक पटकावला.

तसेच सिद्धी उरमुडे (९६.00 टक्के), ऐश्वर्या व्यास (९५.४० टक्के), शर्वरी सांगळे (९४.८० टक्के), अनुष्का कांकरिया (९४.४० टक्के), श्लोका देवकर (९४.४० टक्के), श्रावणी लाकूडझोडे (९४.२० टक्के), ओम धस (९४.२० टक्के), भावना कलाल (९४.00 टक्के), श्रुती चौधर (९३.८० टक्के), विनय चेडे (९३.६० टक्के), अथर्व बोठे (९३.२० टक्के), श्रद्धा पवार (९२.८० टक्के), अंजली जगताप (९१.४० टक्के), रिचा बिहानी (९१.00 टक्के), तपस्या पवार (९0.४० टक्के), आयुष देशमुख (९0.२० टक्के), यश झरेकर (९0.२० टक्के) आणि आकांक्षा भालसिंग (९0.00 टक्के) या विद्यार्थ्यांनी विशेष उल्लेखनीय यश संपादन केले.

अनेक विद्यार्थ्यांनी इंग्रजी, मराठी, हिंदी, विज्ञान, गणित, समाजशास्त्र व संगणक या विषयांमध्ये ९0% पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. प्राचार्य मंगेश जगताप यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या यशासाठी उपप्राचार्या शगुफ्ता काझी, सीनियर ॲडमिन ऑफिसर आशुतोष नामदेव, ॲडमिन ऑफिसर नितीन गवांदे व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

### जिल्ह्यातील स्वयंसेवी संस्था, रुग्णालय प्रतिनिधी बैठक

# संस्थांच्या सहकार्याने आरोग्य सेवा तळागाळात पोहोचणार-डॉ. सोनार

**समाचार/नगर-दि.१७**

जिल्ह्यातील सेवाभावी संस्था, रुग्णालये व स्वयंसेवी संघटनांनी एकत्रितपणे कार्य केल्यास आरोग्य सेवा अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचू शकते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे राज्यस्तरीय वैद्यकीय समन्वयक डॉ. स्वानंद अरुण सोनार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील समन्वयासाठी आयोजित मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या विशेष बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनीही या अभियानाची माहिती जाणून घेतली. यावेळी निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उत्तर महाराष्ट्र विभागीय समन्वयक डॉ. अजित विसपुते, राज्य समन्वयक युवराज महाजन, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक अजय काळे, लिपिक स्वप्नील कच्छवे, जिल्हा समन्वयक महेश सोलाट तसेच जिल्ह्यातील ६८ स्वयंसेवी संस्था व प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. सोनार म्हणाले, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष सर्व उपक्रमांना आवश्यक समन्वय व सहकार्य देण्यासाठी कटिबद्ध आहे. वैद्यकीय सेवांमधील तोतयागिरी अथवा अनुचित प्रकारांबद्दल कारवाईचे कडक निर्देश त्यांनी दिले. मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत गेल्या वर्षभरात पुरवलेल्या सेवा, विशेष उपक्रम व वितरित निधी यासंदर्भात संक्षिप्त आढावा देण्यात आला.

जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी दरमहा सामुदायिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचे नियोजन रुग्णालयांनी करावे. त्यात सेवाभावी संस्थांनी व्यापक स्वरूपात सहभागी व्हावे. कर्करोग व मुख आरोग्य तपासणीचे प्रमाण वाढवण्यासाठी फिरत्या चिकित्सा पथकांचा वापर वाढवावा, असेही त्यांनी आवाहन केले.

जिल्ह्यातील क्षयरोगग्रस्त रुग्णांच्या पार्श्वभूमीवर विशेष प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव दीप फाउंडेशन व विविध संस्थांच्या वतीने मांडण्यात आला. क्षयरोगग्रस्तांसाठी पोषण व आहार पुरवठ्यासाठी काही संस्था इच्छुक असल्याने नाबार्डचे सहाय्यक महाप्रबंधक विक्रम पठारे यांनी हा प्रस्ताव तत्त्वतः मान्य केला. प्रशासन, रुग्णालये व स्वयंसेवी संस्थांनी मिळून वाढत्या मानसिक आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर समुपदेशन सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही नमूद करण्यात आले.

सदर उपक्रमासाठी इंडो आयरिश हॉस्पिटल, मॅक केअर हॉस्पिटल, पंडित हॉस्पिटल, बूथ हॉस्पिटल, गरुड कॅन्सर हॉस्पिटल यांनी मोफत तपासणी व उपचार करण्यासाठी तयारी दर्शवली. तसेच नाबार्ड, दीप फाउंडेशन, आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन, प्रथम फाउंडेशन, कृष्णाली फाउंडेशन, सीआरएचपी फाउंडेशन, जामखेड, सीएसआरडी, बॉस्को ग्रामीण विकास केंद्र या सामाजिक संस्थांनीही विविध स्वरूपात सेवा देण्याचा मानस व्यक्त केला. या बैठकीबाबत ड. प्रियंका बोबडे-शेळके, मंदा पोळ, निर्मला केदारी, प्रदीप बांगर, राजेंद्र पवार, प्रविण साबळे, रविंद्र गायकवाड, जयेश कांबळे, हर्षल आंगळे यांनी आपापली मते मांडून समाधान व्यक्त केले व 'निरामय अहिल्यानगर' उपक्रम यशस्वी करण्याचा मानस व्यक्त केला.

# शंकर महाराज पालखी सोहळ्याचे उद्या प्रस्थान

**समाचार/नगर-दि.१७**

सद्गुरू शंकर महाराज समाधी सोहळ्यानिमित्ताने अहिल्यानगर ते धनकवडी (पुणे) पायी पालखी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी शंकरलिला परिवाराचे केडगाव येथील सद्गुरू विजयनाथ केदारी महाराज यांच्या मार्गदर्शनात उद्या शनिवारी (दि. १८) रोजी निघत आहे. ही यात्रा शुक्रवारपर्यंत (दि. २४) होणार आहे. यावर्षी या पालखीचे हे नववे वर्ष आहे, अशी माहिती भक्तमंडळीकडून देण्यात आली.

ही पायी पालखी अहिल्यानगर, चास, सुपा, शिरूर, रांजणगाव गणपती, कोंढापुरी, वाघोली, चंदननगर, हडपसर बायपास मार्गे श्री सद्गुरू शंकर महाराज मठ, धनकवडी (पुणे) येथे पोहोचणार आहे.

पालखीचा कार्यक्रम : शनिवार दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीस्वामी समर्थ मंदिर, डी. एड्. कॉलेज, दिल्लीगेट येथून प्रस्थान करणार आहे. अक्षय्यतृतीया, रविवार दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ६ वा. केडगाव मार्गे, कामरगांव, भंडारी परिवाराकडून भोजन आणि श्री. जंगम यांच्याकडे विश्रांती.

सोमवार दि. २० एप्रिल रोजी वाघुंडे येथून प्रस्थान, मंगळवार दि. २१ एप्रिल रोजी रांजणगाव मंदीर दर्शन, बुधवार दि. २२ एप्रिल रोजी शिक्रापूर येथून कोरेगांव भिमा येथे प्रस्थान करीत , गुरुवार दि. २३ एप्रिल रोजी धनकवडी मठाकडे प्रस्थान.

# महात्मा फुले शाळेसाठी प्रा. जाधव यांची लाखाची देणगी

**समाचार/नगर-दि.१७**

श्री संत सावता आश्रम शिक्षण समितीच्या महात्मा फुले शाळेच्या बांधकामासाठी प्राध्यापक सुनील जाधव यांनी एक लाख रुपयांचा धनादेश देत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. हा धनादेश उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते संस्थेचे चेअरमन तथा नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेच्या उभारणीस नवी गती मिळणार असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी शिक्षणाच्या उन्नतीसाठी समाजातील सर्व घटकांनी पुढे येणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. शिक्षण हीच खरी ताकद असून त्याद्वारेच समाज परिवर्तन शक्य आहे. महात्मा फुले



यांच्या विचारांवर चालत आपण शिक्षणाचा प्रसार वाढवला पाहिजे, असे ते म्हणाले. तसेच, शाळेच्या बांधकामासाठी मिळालेली ही मदत भविष्यातील पिढी घडविण्यासाठी महत्त्वाची ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

उपमहापौर धनंजय जाधव यांनी प्राध्यापक सुनील जाधव यांच्या कार्याचे कौतुक करताना, शिक्षण क्षेत्रात योगदान देणे म्हणजे देशाच्या भविष्याला बळकटी देणे होय. अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजात प्रेरणा निर्माण होते, असे मत व्यक्त केले. त्यांनी शाळेच्या बांधकामासाठी महानगरपालिकेच्या पातळीवरही आवश्यक ते सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमास नितीन पुंड, गोरख बोरुडे, विजय गाडळकर, परेश लोखंडे, संदीप खरपुडे, विक्की लोखंडे, चेतन शिरसुल यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत प्राध्यापक सुनील जाधव यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

# स्व. जगताप यांच्या स्मरणार्थ १९ पासून संगीतमय रामकथा

**समाचार/नगर-दि.१७**



माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ प्रसिद्ध कवी आणि रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या 'अपने-अपने राम' या संगीतमय रामकथेचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले आहे. काका ट्रस्ट या सेवाभावी संस्थेच्या वतीने स्व.अरुणकाका जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त या रामकथेचे आयोजन केले आहे. रविवार दि. १९ ते २१ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी ६ ते ९ यावेळेत शहरातील आनंदधाम रोड वरील राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य प्रांगणात ही संगीतमय रामकथा होणार आहे. नगरमधील सर्वात मोठ्या ठरणाऱ्या या रामकथेच्या कार्यक्रमाची तयारी सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णत्वास येत आहे. सर्व भाविकांसाठी हा रामकथेचा सोहळा खुला आहे, अशी माहिती काका ट्रस्टचे राजेश भंडारी यांनी दिली.

रामकथा सोहळ्याची अधिक माहिती देताना नगरसेवक विकी जगताप म्हणाले, देशात लोकप्रिय असलेले रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या रसाळ वाणीतून श्रीराम कथेची दुर्लभ पर्वणी नगरकरांना प्राप्त होणार आहे. या सोहळ्यासाठी सहकार सभागृहा समोरील राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य प्रांगणात जर्मन हँगर पद्धतीचा वॉटर फ्रुफ २०० फुट बाय ५०० फुटाचा भव्य मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपात हजारो भाविकांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आकर्षक सजावट असलेले व्यासपीठ उभारण्यात आले आहे. मंडपात लाईट, स्पीकर व ठिकठिकाणी एलईडी वॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कार्यक्रमस्थळी तातडीच्या वैद्यकीय उपचार, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन याचबरोबर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह व्यवस्थेसह इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भाविकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची सुटसुटीत व्यवस्था जवळच करण्यात आली आहे.

गणेश गोंडाळ, शशिकांत घिगे यांची भाषण झाली. माजी आमदार स्व.अरुण जगताप यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त होणाऱ्या या ऐतिहासिक रामकथा सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी व्हावे व तिन्ही दिवस महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन काका ट्रस्टचे अनिल मुरकुटे, अजित जगताप व अनुप काळे यांनी केले आहे.

# प्राजक्त तनपुरे यांचे भाजपामध्ये स्वागतच-चव्हाण

**समाचार/नगर-दि.१७**

राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य विजय संकल्प सभा संपन्न झाली. या सभेला पदाधिकारी, कार्यकर्ते व बूथ प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासदृष्टीचा उल्लेख करत सांगितले की, त्यांच्या नेतृत्वामुळे देश व राज्यात विकासाला गती मिळाली आहे. त्यामुळेच जनतेचा त्यांच्यावर




विश्वास असून प्रेमही वाढले आहे.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी जर भाजपमध्ये पक्षप्रवेश केला, तर त्यांचे स्वागतच आहे. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत अक्षय कर्डिले यांना विधानसभेत पाठवावे. त्यांच्या माध्यमातून मतदारसंघाच्या विकासाला गती मिळेल आणि मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होईल.

रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना आवाहन करताना सांगितले की, स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांना खरी श्रद्धांजली द्यायची असेल, तर अक्षय कर्डिले यांना विजयी करणे आवश्यक आहे. पक्षाशी नाळ जोडलेल्या कार्यकर्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती प्रत्येक घरापर्यंत पोहोचवावी.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी तालुक्याच्या विकासासाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे. मात्र कोणतीही निवडणूक सोपी नसते, त्यामुळे कार्यकर्त्यांनी गाव सोडायचे नाही आणि प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचायचे आहे. सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले की, ही निवडणूक सार्वत्रिक नसून स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या दुःखद निधनामुळे लागलेली पोटनिवडणूक आहे. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी उमेदवारी न भरता पाठिंबा दिला आहे, आता त्यांनी अधिकृत पाठिंबा द्या. या सभेत माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी प्रास्ताविक केले तर उमेदवार अक्षय कर्डिले यांनी आभार मानले.

### सत्रामध्ये चर्चासत्र प्रश्नोत्तर संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन

# आयएमएसमध्ये बौद्धिक संपदा हक्क, डिझाईन फायलिंग विषयावर कार्यशाळा

**समाचार/नगर-दि.१७**

भा.पा. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.) या संस्थेमार्फत १७ एप्रिल २०२६ रोजी गुगल मीटच्या माध्यमातून बौद्धिक संपदा हक्क (आय.पी.आर.), पेटंट व डिझाईन फायलिंग या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. भारत सरकारच्या नॅशनल इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी अवेअरनेस मिशन अंतर्गत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हे सत्र आयोजित करण्यात आले होते.



डॉ. मुदस्सर सय्यद यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी प्रमुख वक्त्यांचे स्वागत केले. या सत्राचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. भारत एन. सूर्यवंशी, असिस्टंट कंट्रोलर ऑफ पेटंट्स अँड डिझाईन्स, आर.जी.एन. आय.आय.पी.एम., नागपूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. केंद्रीय शासनाच्या पेटंट कार्यालयात २२ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या डॉ. सूर्यवंशी यांनी बौद्धिक संपदा हक्कांची संकल्पना, पेटंट, ट्रेडमार्क, कॉपीराइट, इंडस्ट्रियल डिझाईन, जिओग्राफिकल इंडिकेशन्स (जी.आय.) तसेच पेटंट अर्ज प्रक्रिया याविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यांनी नेटफ्लिक्स, कोविड लस, डॉमिनोज, कोका-कोला, सोलर रूफ टाईल्स, कार्बन कॅप्चर तंत्रज्ञान यांसारख्या उदाहरणांद्वारे आधुनिक नवकल्पना आणि त्यांचे संरक्षण याचे महत्त्व स्पष्ट केले. शोध (डिस्कव्हरी) आणि आविष्कार (इन्व्हेन्शन) यांतील फरक समजावून सांगताना समाजोपयोगी, नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त संकल्पनांचे संरक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

सार्वजनिक घोषणापूर्वी पेटंट अर्ज दाखल करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. यावेळी आय.पी.आर. क्षेत्रातील करिअर संधी, सरकारी व खासगी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी, कृषी क्षेत्रातील प्लांट व्हरायटी प्रोटेक्शन आणि फार्मर्स राईट्स याविषयीही त्यांनी माहिती दिली. सत्रामध्ये चर्चासत्र, प्रश्नोत्तर आणि संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन झाल्याने सहभागींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या सत्रास ३०० हून अधिक सहभागी, शिक्षक, संशोधक व प्राध्यापक वर्ग यांनी उपस्थिती लावली.

या वेबिनारचे समन्वयक म्हणून डॉ. राहुल खंडेलवाल यांनी जबाबदारी पार पाडली. सूत्रसंचालन डॉ. मुदस्सर सय्यद यांनी केले. तांत्रिक बाबींचे नियोजन प्रा. प्रताप गायकवाड यांनी सांभाळले.

# त्रिवेणी संगमद्वारा अक्षय पुण्यप्राप्तीचा योग

**समाचार/नगर-दि.१७**

वैशाख शुध्द तृतीया, म्हणजे अक्षय तृतीया जैन धर्मा प्रमाणे हिंदू धर्मात ही या दिवसाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. या दिवशी केले जाणारे सत्कार्य अनंत गुणा फलप्राप्ति देते. तसेच हा दिवस साडे तीन मुहुर्तां पैकी एक मुहुर्त आहे. जैन धर्मीयांचे प्रथम तीर्थंकर श्री ऋषभदेव भगवान यांच्या तपसाधने मुळे अक्षय तृतीयेला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

मोक्षप्राप्ती साठी आवश्यक असलेल्या दान - शील - तप - भाव पैकी दान व तप चा प्रारंभ या दिवसापासून झाला . भगवान ऋषभदेव यांच्या वर्षीतप चा पारणा श्रेयांसकुमार द्वारा सुपात्र दान देऊन झाला. वर्षीतप पारणा ही पवित्र परंपरा दीर्घ काळानंतर ही आजतागायत जैन धर्मावलंबी जपत आहेत. राष्ट्रसंत आचार्य सम्राट प पू श्री आनंदऋषिजी म सा, यांच्या पावन सानिध्यात आनंदधाम



येथे वर्षीतप तपस्वींच्या पारणा समारोहाची सुरुवात झाली. ४५ वर्षांपासून डामडौल रहित, भक्तिमय वातावरण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. यावर्षी सोमवार, २० एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र प्रवर्तक पू श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुध्द विचारक पू श्री आदर्शऋषिजी म सा, संस्कार दिवाकर पू श्री आलोकऋषिजी म सा इत्यादी साधु - साध्वी महाराजांच्या पावन सानिध्यात संपन्न होत असलेल्या वर्षीतप पारणा समारोहासाठी महाराष्ट्रातील तसेच अन्य प्रांतातील शेकडो तपस्वी येणार आहेत. तसेच तपस्वी साधु संतांचे पारणे होणार आहेत.

आचार्य आनंदऋषिजी म सा यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमिवर साधु - संतांच्या दर्शनाचा, प्रवचन, सत्संगाचा लाभ घेऊन वर्षीतप तप अनुमोदना करण्यासाठी सर्व श्रावक - श्राविकांनी जास्तीत जास्त संख्येने सकाळी ९ वाजता उपस्थित राहावे.

आनंदमय उर्जा, गुरु सत्संग व तप अनुमोदना या त्रिवेणी संगमद्वारा अक्षय पुण्य प्राप्ति चा लाभ घ्यावा, असे आवाहन वर्धमान स्था. जैन श्रावक संघ व तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड च्या वतीने करण्यात आले आहे. सेवाभावी सागर गोकुळजी गांधी-गांधी परिवारकडून सर्वांसाठी गौतम प्रसादीचे आयोजन करन्यात आले आहे.

### भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा; पुष्प चौथे

# पाश्चात्यांच्या अंधानुकरणाने भारतीय संस्कृतीचा ऱ्हास - उपाध्याय

**समाचार/नगर-दि.१७**

पाश्चात्यांच्या अंधानुकरणाने भारतीय संस्कार अन् संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे, असे प्रतिपादन वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी केले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे चतुर्थ पुष्प गुंफताना ते बोलत होते.

सर्वश्री सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील मान्यवर प्रतिष्ठित भाविक श्रोतृवृदांच्या सेवेसाठी तत्पर आहेत.



उपाध्याय म्हणाले, भारतीय संस्कार आणि संस्कृती चिरकालापासून चालत आली आहे. अलिकडे युवक-युवती पाश्चात्यांचे अंधानुकरण करू लागल्याने भारतीय संस्कार अन् संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे, हे थांबवणे आपल्या युवकांच्याच हाती आहे. भारतीय रितीरिवाज, संस्कार, परंपरा, संस्कृती जगदवंद्य ठरली. तरीही परदेशाचे आकर्षण का? असा सवाल करून ते पुढे म्हणाले, संपत्तीच्या संग्रहाचा हव्यास आपल्याला कधीही भगवत प्राप्ती करू देणार नाही. भगवंताच्या कथेतच आत्मशांती मिळेल. भगवंताच्या कथा, व्यासपीठ, आचार्य यांच्याबद्दल आपल्या मनात सदैव श्रध्दायुक्त निष्ठा असावी. भावुकता, नम्रता असावी. मंदिरात भगवंताचे दर्शन घेताना, ध्यान करताना, सत्संगात डोळ्यांमधून अश्रुधारा सुरू व्हाव्यात.

कोणत्याही भक्ताला आणि ब्राह्मणाला आपल्याकडून दु:ख होईल, असे कधीही वागू नये. भगवान श्रीकृष्ण आपल्यापासून दूर निघून जातील असे कोणतेही कर्म करू नये. धर्माचरण श्रध्देने करावे. भगवान श्रीकृष्णांच्या सर्व लिलांमध्ये संक्षिप्त ज्ञान लपलेले आहे ते शोधण्याचा प्रयत्न करावा. सर्व भाव आणि सर्व गुणांनी युक्त असा हा पुरूषोत्तम परमात्मा आपला होईल, असे वागावे असे ते म्हणाले.

उपस्थित हजारो स्त्री-पुरूष भाविकांना दर्जेदार सात्विक प्रसाद देण्याची सेवा सर्वश्री दिनेश अग्रवाल, सुदिप अग्रवाल आणि सागर अग्रवाल यांनी स्वयंस्फूर्तीने आणि श्रध्देने केली. त्यांना विनोद पटेल, राजूभाई पटेल, मिलिंद चवंडके, शिरीष तिवारी, पवन खंडेलवाल यांनी सहाय्य केले.

# परशुराम प्रतिष्ठानच्या रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन




**समाचार/नगर-दि.१७**

भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठान व कै. शशिकांत गटणे यांच्या स्मरणार्थ आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन भगवान श्री परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी निसळ गुरुजी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे, अनंत कुलकर्णी,अतुल शुक्ल, श्रीया देशमुख,अमित गटणे, करण भळगट, अनिरुद्ध भउरकर, ऋतू वैद्य, शिरीष देशपांडे,उदय जोशी ,अनंत होशिंग, निनाद हिरवे,आदी मान्यवर उपस्थित होते. नालेगावातील जनकल्याण रक्तकेंद्रात सदर शिबिर झाले.

अमित गटणे, विजय देशपांडे यांची भाषणे झाली. शिबिरासाठी प्रतिष्ठान चे सर्व सदस्यांनी व सोनाली खांडरे, डॉ.गुलशन गुप्ता, मनिषा जोशी, स्मिता बडवे,सागर उंडे,गौरव पठाडे,सुलभा पवळ, जनार्दन मडूर, प्रिती चिपाडे, अविनाश कदम, गजेंद्र सोनावणे आदी नी परिश्रम घेतले.


**Rental Flat Require**

पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर ३ बीएचके फ्लॅट भाड्याने पाहिजे.
(बॅटरी बॅकअप किंवा जनरेटरसह लिफ्ट आवश्यक)
संपर्क : 9822115585

**पाहिजेत**

हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेटर जागा - 1
अकौंटंट कम कॅशिअर जागा - 1
आकर्षक पगार
संपर्क : जोशी हॉस्पिटल
7249284646


## जाहीर निविदा नोटीस

ग्रामपंचायत **मांडवे बु. ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांच्याकडून जाहीर निविदा नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ग्रामपंचायत **मांडवे बु., ता. संगमनेर** अंतर्गत खालील काम करण्यासाठी सिलबंद लिफाफ्यात ब-१ निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फी | वर्ग | लेखाशीर्ष | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे मांडवे बु. ता. संगमनेर येथील जि.प. प्रा.शाळेमध्ये टॅप कनेक्शन व हँडवॉश स्टेशन बसविणे. | ८४७०५/- | १% | २३६/- | खुला | १५वा वित्त आयोग | ६ महिने |
| २ | मौजे मांडवे बु. ता. संगमनेर येथील जि.प. प्रा.शाळेसाठी क्रीडा साहित्य कॉम्प्युटर व प्रिंटर खरेदी करणे. | १६९३५०/- | १% | २३६/- | खुला | १५वा वित्त आयोग | ६ महिने |
| ३ | मौजे मांडवे बु. ता. संगमनेर येथील अंगणवाडीसाठी सोलर सिस्टीम बसविणे. | २५४११०/- | १% | २३६/- | खुला | १५वा वित्त आयोग | ६ महिने |
| ४ | मौजे मांडवे बु. ता. संगमनेर येथील चौघुले वस्ती अंगणवाडी येथे स्ट्रीट लाईट बसविणे. | ८४५७८/- | १% | २३६/- | खुला | १५वा वित्त आयोग | ६ महिने |
| ५ | मौजे मांडवे बु. ता. संगमनेर येथील मातंग वस्ती अंगणवाडी येथे स्ट्रीट लाईट बसविणे. | ८४५७८/- | १% | २३६/- | खुला | १५वा वित्त आयोग | ६ महिने |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटी याबाबतची माहिती ग्रा. पं. कार्यालयात **दि. १७/०४/२०२६ ते २४/०४/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सिलबंद निविदा **दि. २४/०४/२०२६** रोजी सायं. ५ वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा शक्यतो **२७/०४/२०२६** रोजी सकाळी ११ वा. उघडण्यात येतील. निविदा मंजूर-नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायत **मांडवे बु., ता. संगमनेर** ने राखून ठेवला आहे. **आवश्यक प्रमाणपत्र** :- १) जि. प. नोंदणीप्रमाणपत्र, २) पॅनकार्ड, ३) जी. एस. टी. प्रमाणपत्र, ४) आधारकार्ड, ५) सत्यप्रतिज्ञापत्र

**ग्रामविकास अधिकारी/सरपंच**
**ग्रा. पं. मांडवे बु., ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.**


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या


**सेक्स समस्या**


वाईट सवयीचे दुष्परिणाम / स्वप्नदोष / धातुपात / शीघ्रपतन / असमाधान
कमजोरी / शुक्राणुंची कमी / गुप्तरोग / त्वचारोग / नपुंसकत्व / मानसिक नैराश्य

**डॉ. अभय मुथा** (मनोलैंगिक विकार तज्ञ)
२९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
संपर्क: 94 22 23 90 13 ▪ www.sextreatment.in

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दि.१७/०४/२०२६ ते दि.२३/०४/२०२६










| BHOOTH BANGLA (हिंदी) | |
|---|---|
| 09.00 AM | 10.30 AM |
| 12.15 PM | 01.00 PM |
| 01.50 PM | 05.10 PM |
| 06.30 PM | 08.30 PM |
| 10.00 PM | |

| DHURANDHAR THE REVENGE (हिंदी) | |
|---|---|
| 08.30 AM | 12.45 PM |
| 05.00 PM | 09.15 PM |

| LEE CRONIN'S THE MUMMY (हिंदी) | |
|---|---|
| 10.00 AM (ENG) | 04.15 PM |
| 07.00 PM | 09.45 PM |

| SUPER DUPER (मराठी) |
|---|
| 03.45 PM |

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

आपल्या उज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...
देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर
Evacuated Tube Collector
V-GUARD Solar Water Heater MNES Approved
V-GUARD
Solar Water Heater
- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे
SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD
उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध




**आदित्य**
एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर.
(*अटी लागू)
9325103781

**डागा**
**शांतीलाल डागा**
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०
शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स,



**घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा**
वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना
घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)



(सहयोग - स्नेहालय)
**स्नेहदीप केंद्र**
केडगाव, अहमदनगर
9011020176, 9011026483, 7499980845


## ग्रामपंचायत पुणतांबा-रस्तापूर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

## जाहीर निविदा सूचना

**मौजे पुणतांबा-रस्तापूर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर** हे खाली नमूद केलेल्या कामासाठी **नोंदणीकृत मजूर संस्था/नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता/जि.प. नोंदणीकृत ठेकेदार** यांच्याकडून ब-१ निविदा मागवित आहे. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालय **पुणतांबा, ता. राहाता, जि. अहिल्यानगर** येथे कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील. **दि. १७/०४/२०२६ ते २४/०४/२०२६** पर्यंत प्राप्त झालेल्या निविदा **दि. २७/०४/२०२६** सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात शक्य असल्यास हजर असणारे ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | बयाणा रक्कम | कामाची मुदत | ठेकेदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे पुणतांबा येथे धनवटे पढई परिसर येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | १५ वा वित्त आयोग ग्रा.पं.स्तर सन २०२४-२५ | २१४०२३/- | १००/- | १ % | ६ महिने | खुला |

**टीप** :- निविदा संबंधी अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील. निविदा व अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत विकास अधिकारी/सरपंच**
**ग्रामपंचायत पुणतांबा-रस्तापूर, ता. राहाता, जि. अहिल्यानगर**





प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144